# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| महिला उद्योजकतेचा नवा उत्साह !! | २ |
| तुझ्यामुळेच सुचली कविता...! | ५ |
| तरुणाई आणि सोशल मीडिया: बदलते संवादाचे व्यासपीठ. | ६ |
| तरुणाई आणि कलेचे बदलते स्वरूप | ८ |
| जो गीत नहीं बना वो गीत बनायेंगे | १० |
| ती महिला अध्यक्ष झाली... | १४ |
| अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन उत्साहात संपन्न | १६ |
| महाराष्ट्रातील शिल्पकला आणि ऐतिहासिक लेणी | १८ |
| कोपेश्वर खिद्रापूर मंदिर : नंदी नसलेले शिवमंदिर | २० |
| लोणार सरोवर : निसर्गाचा अद्वितीय चमत्कार आणि वैज्ञानिक आश्चर्य | २१ |
| ऊस शेतीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव | २२ |
| तळेगावचे पाच पांडव मंदिर ः एक पौराणिक ठेवा | २४ |
| शिकायला गेलो एक : विनोदी व नातेसंबंध, आणि सामाजिक बदलांचा विचार करणारे नाटक | २५ |
| आई नावाची परी. | २६ |
| कचरा व्यवस्थापन आणि त्याचा भविष्यातील विकास | ३० |
| आचार्य पंडित मुकुल शिवपुत्र : स्वरतपस्वी गंधर्व | ३२ |
| पुण्यातील ऐतिहासिक 'मातीचा गणपती' | ३३ |
| 'आदिम' संवाद- भूतकाळातील कोड | ३४ |
| हायपर सेंसिटिव्हिटी न्यूमोनियाः कबुतरांपासून होणारा गंभीर श्वसन विकार आणि प्रतिबंधात्मक उपाय | ३६ |
| कविता - बापमाणूस | ३८ |
| कविता - कागदाचं विमान कर | ३९ |
| श्रीराम कथामृत | ४० |

# महिला उद्योजकतेचा नवा उत्साह!



**आजच्या युगात महिलांनी उद्योग आणि व्यवसायाच्या क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. घराच्या चार भिंतीपलीकडे जाऊन स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचे त्यांचे धाडस, मेहनत आणि कौशल्य समाजातील मोठा बदल घडवत आहे. योग्य दिशा, शिक्षण आणि समर्थन मिळाल्यास महिलांची उद्योजकता आणखी बहरू शकते, आणि समाजाच्या आर्थिक प्रगतीला नवा वेग मिळू शकतो.**

**सिद्धेश नवनाथ आभाळे**

आजच्या युगात कृषी, तंत्रज्ञान, शिक्षण, आरोग्य, आणि डिजिटल क्षेत्रात महिलांनी आपली छाप सोडली आहे. योग्य दिशा, शिक्षण आणि समर्थन मिळाल्यास महिलांची उद्योजकता आणखी बहरू शकते, आणि समाजाच्या आर्थिक प्रगतीला नवा वेग मिळू शकतो.

समाजात महिलांनी अनेक क्षेत्रांमध्ये आपली छाप सोडली आहे, आणि त्यात उद्योजकता एक महत्वाचा भाग बनला आहे. ज्या काळी महिलांना घराच्या गाभ्यात मर्यादित ठेवले जात होते, त्या काळात आज महिलांनी उद्योग आणि व्यवसायाच्या क्षेत्रात आपला ठसा उमठवला आहे. त्यांचा कष्ट, धाडस, आणि स्मार्ट कामकाजी कौशल्ये आजच्या युगातील उद्योजकतेचा पाया आहेत. त्याबद्दल काही उदाहरणे पाहिल्यास, अनेक महिलांनी आपल्या छोटे व्यवसाय सुरु करून मोठे यश मिळवले आहे, कृषी क्षेत्र, शिक्षण, फैशन, आरोग्य, तंत्रज्ञान आणि इतर अनेक क्षेत्रांमध्ये महिलांनी आपले कार्य आरंभले आहे. त्यांनी धाडस आणि चिकाटीने अडचणीचा सामना करून आपला व्यवसाय वृद्धिंगत केला आहे. महिलांमध्ये उद्द्योजकतेची आवड नक्कीच वाढली आहे. योग्य दिशा, शिक्षण, प्रेरणा आणि समर्थन मिळाल्यास महिलांची उद्योजकता आणखी फुलवता येईल. समाजाच्या प्रत्येक स्तरावर महिलांना समान संधी मिळाल्यास त्यांचा व्यवसाय आणखी फुलू शकती, आणि समाजातील बदलांच्या दिशेने सकारात्मक पाऊल टाकता येईल. उद्योजकतेचा मार्ग महिलांसाठी आत्मविश्वास वाढविणारा आणि त्यांच्या आर्थिक परिस्थितीला सुधारण्याचा एक महत्त्वपूर्ण उपाय आहे.

महिलांमध्ये उद्योजकतेच्या प्रवृत्तींना मागे ठेऊन, आज महिलांनी स्वतःला एक नव्या पिढीतील उद्योजक म्हणून स्थापित केले आहे.





काळानुसार, ज्या महिलांना घराच्या चार भिंतीपलीकडे जाऊन काहीतरी निर्माण करण्याची संधी मिळत नव्हती, त्याच महिलांनी आज अनेक उद्योगांची यशस्वी शुरुआत केली आहे. या बदलाला समाजातील संकल्पनात्मक बदल, तंत्रज्ञानातील प्रगती, आणि महिला सशक्तीकरणाचे महत्वपूर्ण घटक मानले जातात. महिलांसाठी उद्योजकता फक्त आर्थिक स्वावलंबन साधण्याचा मार्ग नाही, तर त्यांना समाजात समान अधिकार मिळवून देण्याचा आणि त्यांचे स्थान दृढ करणारा एक महत्वाचा दृषटिकोन आहे. महिलांना त्यांच्या सृजनशीलतेचा वापर करून उद्द्योगांची यशस्वी सुरवात करण्यासाठी विविध यंत्रणा आणि समर्थन उपलब्ध होत आहे. सरकार, एनजीओ, आणि वेगवेगळ्या प्रशिक्षण संस्थांद्वारे महिलांना उद्योजकतेची शिक्षण आणि सहाय्य मिळवून दिले जात आहे. आजच्या डिजिटल युगात तंत्रज्ञानाने व्यवसाय आणि उद्योगातील महिला सहभाग वाढवला आहे. महिलांनी ऑनलाईन व्यवसाय, डिजिटल मार्केटिंग, आणि सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट अशा क्षेत्रांमध्ये योगदान दिले आहे. हे क्षेत्र तांत्रिक कौशल्यांच्या वापराची संधी देल आहेत, आणि महिलांसाठी त्यामध्ये उत्कृष्टता प्राप्त करणे शक्य बनवले आहे. यामध्ये सर्वात मोठा बदल म्हणजे समाज आणि संस्कृतीतील बदल....

महिलांच्या उद्द्योजकतेमध्ये महिलांच्या कुटुंबातील, विशेषतः पती आणि कुटुंबातील इतर सदस्यांचा समर्थन खूप महत्त्वाचा ठरतो. आज अनेक पुरुष महिलांना त्यांच्या व्यवसायाच्या उद्दिष्टांसाठी पाठिंबा देत आहेत. यामुळे एक सामाजिक बदल घडतो आहे, जिथे महिलांच्या कर्तृत्वाला मान्यता दिली जात आहे. महिलांमध्ये उद्द्योजकतेची आवड एक सकारात्मक परिवर्तन दर्शवते, जिथे त्या आपल्या कुटुंबाच्या, समाजाच्या आणि स्वतःच्या जीवनाच्या भविष्यासाठी चांगले निर्णय घेत आहेत. या प्रवृतीमुळे महिलांना योग्य संधी मिळाल्यास, त्या केवळ व्यावसायिक यशाचाच फायदा घेत नाहीत, तर सामाजिकदृष्ट्या मोठा बदल घडवून दाखवतात.

महिलांची उद्योजकता केवळ आर्थिक दृष्टिकोनातून महत्वाची नाही, तर ती समाजात सशक्तीकरण आणि समानता आणण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. महिलांचे उद्योजकतेकडे आकर्षण वाढताना दिसत आहे. महिलांच्या उद्योजकतेची आवड किंवा त्यांचा यामध्ये सहभाग वेगाने वाढत आहे. अनेक महिलांना त्यांच्या व्यवसायाच्या संधीचा वापर करून स्वतंत्रपणे काम करण्याची प्रेरणा मिळालेली आहे. यामध्ये काही प्रमुख कारणे आहेतः

महिलांना त्यांच्या कार्यक्षेत्रात स्वतंत्रतेची भावना प्राप्त होण्याची इच्छा असते. उद्द्योजकतेमुळे त्यांना आर्थिक आणि मानसिक स्वातंत्र्य मिळवता येते. महिलांना त्यांच्या कामाच्या माध्यमातून समाजात बदल घडवण्याची इच्छा असते. ते समाजात सकारात्मक प्रभाव टाकू इच्छितात, आणि त्यांच्या व्यवसायातून या बदलाची सुरुवात करु इचिडतात. आजकाल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून महिलांना नवीन उद्योग क्षेत्रात प्रवेश करण्याची संधी मिळत आहे. ऑनलाइन व्यवसाय, ई-कॉमर्स आणि डिजिटल मार्केटिंग यासारख्या क्षेत्रांमध्ये महिलांचे योगदान वाढले आहे. महिलांमध्ये उद्योजकतेची आवड नक्कीच वाढली आहे. योग्य दिशा, शिक्षण, प्रेरणा आणि समर्थन मिळाल्यास महिलांची उद्योजकता आणखी फुलवता येईल. समाजाच्या प्रत्येक स्तरावर महिलांना समान संधी मिळाल्यास त्यांचा व्यवसाय आणखी फुलू शकतो, आणि समाजातील बदलांच्या दिशेने सकारात्मक पाऊल टाकता येईल. उद्द्योजकतेचा मार्ग महिलांसाठी आत्मविश्वास वाढविणारा आणि त्यांच्या आर्थिक परिस्थितीला सुधारण्याचा एक महत्वपूर्ण उपाय आहे.

महिलांमध्ये उद्द्योजकतेच्या प्रवृत्तींना मागे ठेऊन, आज महिलांनी

स्वतःला एक नव्या पिढीतील उद्योजक म्हणून स्थापित केले आहे. काळानुसार, ज्या महिलांना धराच्या चार भिंतीपलीकडे जाऊन काहीतरी निर्माण करण्याची संधी मिळत नव्हती, त्याच महिलांनी आज अनेक उद्योगांची यशस्वी शुरुआत केली आहे. या बदलाला समाजातील संकल्पनात्मक बदल, तंत्रज्ञानातील प्रगती, आणि महिला सशक्तीकरणाचे महत्वपूर्ण घटक मानले जातात. महिलांच्या उद्योजकतेत प्रमुख तत्वे दिसून येतात, ज्यामुळे त्या प्रेरित होतात.



महिलांच्या उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी सरकार विविध योजना लागू करत आहे. "स्टार्टअप इंडिया" आणि "मेक इन इंडिया यांसारख्या योजनांमधून महिलांना उद्योजकतेच्या क्षेत्रात सहयोग आणि मदत मिळवून दिली जात आहे. यामुळे महिलांना उद्योग क्षेत्रात प्रवेश करण्यास प्रोत्साहन मिळत आहे, तसेच त्यांना नवीन बाजारपेठांमध्ये आपले पाय रोवण्यासाठी आवश्यक जान आणि प्रशिक्षण मिळते. महिलांमध्ये उद्योजकतेची आवड हे केवळ एक आर्थिक दृषटिकोन नाही, तर एक सामाजिक आणि मानसिक बदल आहे. महिलांना सक्षम, आत्मनिर्भर आणि समाज बदलणारं बनविण्यासाठी उद्योजकता है एक महत्वाचं साधन आहे. जर महिलांना अधिक संधी, योग्य मार्गदर्शन, आणि संसाधने मिळाली, तर त्यांचं योगदान प्रत्येक क्षेत्रात अत्यंत महत्वाचं ठरू शकेल. यामुळे त्यांचा वैयक्तिक आणि सामाजिक विकास होईल, आणि व्यवसाय क्षेत्रगत महिलांचा प्रभाव अधिक ठळक होईल.

आजच्या आधुनिक युगात महिलांनी आपल्या कर्तृत्वाची नवी दिशा दाखवली आहे. शहरीकरण, तंत्रज्ञानातील प्रगती, आणि बदलत असलेली सामाजिक मान्यता यामुळे महितीना उद्योजकतेच्या क्षेत्रात येण्याचे, तसेच त्यात यशस्वी होण्याचे नवे दरवाजे खुले झाले आहेत. महिलांच्या उद्योजकतेच्या प्रवासामध्ये एक गोष्ट स्पष्ट आहे, की त्यांना केवळ व्यवसायातील आव्हानांचा सामना नाही करावा लागतो, तर त्यांना विविध सामाजिक आणि सांस्कृतिक बंधनांना देखील तोडण्याची गरज आहे.

पारंपारिक घरकामाच्या जबाबदारीतून बाहेर पडून, महिलांना व्यवसाय करताना आर्थिक आणि मानसिक स्वातंत्र्य मिळते. महिलांमध्ये उद्योजकतेची आवड एक सकारात्मक परिवर्तन दर्शवते, जिथे त्या आपल्या कुटुंबाच्या, समाजाच्या आणि स्वतःच्या जीवनाच्या भविष्यासाठी चांगले निर्णय घेत आहेत. या प्रवृत्तीमुळे महिलांना योग्य संधी मिळाल्यास, त्या केवळ व्यावसायिक यशाचाच फायदा घेत नाहीत, तर सामाजिकदृष्ट्या मोठा बदल घडवून दाखवतात. महिलांची उद्योजकता केवळ आर्थिक दृष्टिकोनातून महत्त्वाची नाही, तर ती समाजात सशक्तीकरण आणि समानता आणण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. महिला उद्योजकांसाठी महाराष्ट्र शासनाने विविध योजना सुरु केलेल्या आहेत, ज्यायोगे महिलाना व्यवसाय सुरु करमबासाठी आर्थिक आणि तांत्रिक मदत मिळू शकते.

## काही महत्त्वाच्या योजना खालीलप्रमाणे

### महाराष्ट्र महिला उद्योजक योजना (MWY):

**या योजनेचा उद्देश महिला उद्योजकांना आपल्या व्यवसायाच्या प्रारंभासाठी किंवा विस्तारासाठी वित्तीय मदत प्रदान करणे आहे.या योजनेच्या अंतर्गत महिलांना आर्थिक सहाय्य, प्रशिक्षण आणि सल्लागार सेवा दिली जाते.**

### दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनाः

**ही योजना ग्रामीण भागातील महिलांसाठी आहे. यामध्ये महिलांना कौशल्य प्रशिक्षण दिले जाते, जेणेकरून त्या आपले छोटे व्यवसाय सुरु करू शकतात.**

### महाराष्ट्र महिला उद्द्योग आस्थापन योजनाः

**या योजनेच्या अंतर्गत महिलांना व्यवसाय स्थापित करण्यासाठी आणि त्यात विस्तार करण्यासाठी आर्थिक सहाय्य मिळते. यामध्ये छोटे उद्योग, उत्पादन व सेवा क्षेत्रासाठी मदतीची व्यवस्था आहे.**

### प्रधानमंत्री मुद्रा योजना

**ही योजना महिलांसाठी देखील उपलब्ध आहे, ज्याच्या माध्यमातून महिलांना 10 लाख रुपयांपर्यंत कर्ज दिले जाते, ज्याचा वापर त्या व्यवसाय सुरु करण्यासाठी करू शकतात.**

### स्टार्टअप इंडिया आणि स्टैंड अप इंडिया योजनाः

**या योजनांच्या अंतर्गत महिलांना नव्या व्यवसायांसाठी कर्ज मिळवण्यास मदत केली जाते. यामध्ये एक महिला उद्द्योजकास 25 लाख रुपयांपर्यंत कर्ज दिले जाते.**

# कविता

जीवन महादेव बोधले



## तुझ्या मुळेच सुचली कविता...!

*आठवतात मला आजही तुझे ते आभाराचे शब्द,*
*पाहताच तुझे डोळे, आणि तुला, मी झालो होतो स्तब्ध.*

*आठवतो मला आजही आपण काढलेला पहिला फोटो,*
*तू निघून गेलीस, मनात घर करुन, मी मात्र तिथेच होतो.*

*आठवते मला आजही आपली ती पहिली भेट,*
*दगडूशेठ गणपतीचं दर्शन, आणि राम-सितेची भेट.*

*आठवतो मला आजही आपण घालवलेला वेळ,*
*मारलेल्या गप्पा, एकत्र बसून खाल्लेली मिसळ,*
*आठवलं की वाटतं, कधी लागेल का गं आपल्या आयुष्याचा मेळ?*

*आठवतं मला आजही तू घेतलेलं ते कानातलं,*
*तुझ्या चेहऱ्यावरचं हसू, गोड स्वभाव आणि निर्मळ मनं,*
*पाहिलं की वाटतं, सांगून टाकावं सारं मनातलं.*

*मनातलं सांगाव म्हटलं, पण वेळ मात्र निघून गेली होती,*
*तू नकार देशील या विचाराने आपलं नातं संपण्याची भीती होती.*

*आठवते मला आजही तू दिलेली ती शब्दांची साथ,*
*वाटेवरती चालताना मारलेली ती पाठीवरची थाप.*

*तुझ्यामुळेच सुचली कविता, पुन्हा सुचेल का नाही, माहित नाही,*
*तुझ्यासारखी सुंदर मुलगी, पुन्हा भेटेल का नाही, माहित नाही.*



# तरुणाई आणि सोशल मीडिया: बदलते संवादाचे व्यासपीठ



**डिजिटल क्रांतीमुळे सोशल मीडिया हा तरुणांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. संवादाची जुनी साधने मागे पडत असताना, फेसबुक, इंस्टाग्राम, ट्विटर यांसारख्या प्लॅटफॉर्म्समुळे युवकांना व्यक्त होण्यासाठी नवे व्यासपीठ मिळाले आहे. समाजातील घडामोडींवर प्रभाव टाकण्याची ताकद या माध्यमांत असून, त्याचा सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही परिणाम दिसून येतो.**

**समीक्षा संतोष नाणेकर**

नवीन वर्षाच्या स्वागताने आपल्याला जुन्या आठवणींना उजाळा देण्याची संधी मिळते. पत्रे लिहिण्याची सवय, वहीत चारोळ्या टिपण्याची आवड, मित्र-मैत्रिणींसोबतच्या गप्पा, कुटुंबीयांसोबतचा संवाद—या साऱ्या गोष्टींना मोबाईल आणि सोशल मीडियाने मोठ्या प्रमाणात पर्याय दिला आहे. युवकांनी सोशल मीडियाचा सुज्ञ आणि परिणामकारक वापर करून स्वतःच्या आणि समाजाच्या विकासासाठी त्याचा योग्य तो उपयोग करायला हवा.

औद्योगिक क्रांतीनंतर भारताने वेगाने प्रगती केली, तसेच डिजिटल युगानेही आपल्याला जगाशी जोडले. पूर्वी संवाद साधण्यासाठी मर्यादित साधने होती, मात्र आता स्मार्टफोनमुळे सोशल मीडिया

हा युवकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. फेसबुक, व्हॉट्सॲप, इंस्टाग्राम, ट्विटर, यूट्यूब, टेलिग्राम यांसारखी ॲप्स व्यक्त होण्यासाठी नवे दालन उघडत आहेत.

## सोशल मीडियाचा प्रभाव आणि युवकांची जागरूकता

सोशल मीडियाने युवकांना स्वतःची ओळख निर्माण करण्याची संधी दिली. जगभरातील घडामोडींवर युवक आता मोकळेपणाने व्यक्त होऊ लागले आहेत. उदाहरणच घ्यायचे झाले, तर इजिप्तमधील



फेसबूक क्रांती असो किंवा भारतातील सामाजिक-राजकीय चळवळी, यामध्ये सोशल मीडियाची भूमिका मोठी आहे. NRC-CAA विरोधातील आंदोलनांना मिळालेला प्रतिसाद हेच दाखवून देते की, समाज माध्यमे लोकशाहीच्या सशक्तीकरणासाठी कशी प्रभावी ठरत आहेत.



## सोशल मीडियाचे सकारात्मक परिणाम

आज प्रत्येकाला व्यक्त होण्याचे स्वातंत्र्य आहे. यूट्यूब, ब्लॉगिंग, पॉडकास्टिंगसारख्या माध्यमातून युवक स्वतःचे विचार प्रभावीपणे मांडू शकतात. अनेकांनी सोशल मीडियाद्वारे करिअर घडवले आहे. कंटेंट क्रिएटर, डिजिटल मार्केटिंग, इन्फ्लुएन्सर मार्केटिंगसारखी नवी क्षेत्रे निर्माण झाली आहेत.

राणू मंडल यांचा उदय किंवा प्रियंका रेड्डीच्या घटनेवर झालेल्या व्यापक चर्चेने सिद्ध केले की, समाज माध्यमे जनमत तयार करू शकतात. युवकांना सामाजिक प्रश्नांची जाणीव करून देणारे, त्यांना विचार करण्यास प्रवृत्त करणारे हे एक प्रभावी माध्यम ठरले आहे.

## सोशल मीडियाचे नकारात्मक परिणाम

परंतु, सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावामुळे काही धोकेही समोर येतात. चुकीच्या किंवा अर्धवट माहितीवर विश्वास ठेवून अफवा पसरवल्या जातात. व्हायरल ट्रेंड्स, ट्रोलिंग, आणि चुकीच्या बातम्यांमुळे गैरसमज वाढतात. शिवाय, सोशल मीडियाच्या अतिरेकी वापरामुळे संवाद कौशल्य, वाचनसंस्कृती, आणि मानसिक आरोग्यावरही परिणाम होऊ लागला आहे.

सायबर गुन्हेगारी, ट्रोलिंग, सोशल मीडिया व्यसन, तसेच ऑनलाईन गेमिंगच्या आहारी जाणे यांसारख्या समस्यांनी अनेक युवकांना ग्रासले आहे. ऑनलाईन चर्चांमध्ये अनेकदा सामाजिक भावना दुखावल्या जातात आणि त्यामुळे समाजात तणाव निर्माण होतो.

## समतोल साधण्याची गरज

सोशल मीडिया हे सशक्त माध्यम असले तरी त्याचा वापर सुज्ञपणे करणे गरजेचे आहे. युवकांनी याचा उपयोग ज्ञानार्जन, करिअर संधी, समाजसेवा आणि नव्या कल्पनांची देवाणघेवाण यासाठी केला पाहिजे.

"लॉगिन आणि लॉगआउट" यामधील समतोल साधत, ऑनलाईन आणि ऑफलाईन जगाचा योग्य तो ताळमेळ राखल्यास युवक स्वतःच्या आणि समाजाच्या प्रगतीसाठी सोशल मीडियाचा अधिक चांगल्या प्रकारे उपयोग करू शकतील. फॉरवर्ड, लाईक, शेअरच्या पलिकडे जाऊन विचार करणाऱ्या जाणत्या युवकांची समाजाला आज नितांत गरज आहे.



# तरुणाई आणि कलेचे बदलते स्वरूप



**कला ही केवळ अभिव्यक्ती नव्हे, तर एक जीवनदृष्टी आहे. अभिनेता, दिग्दर्शक आणि लेखक *अजय पाटील* यांनी २५ हून अधिक एकांकिका लिहिल्या व १५ हून अधिक दिग्दर्शित केल्या. मालिकांमधून त्यांनी अभिनय केला. डिजिटल युगात कला बदलली असली, तरी तिचे महत्त्व अबाधित आहे. अजय पाटील *मौलिकता जपत, नव्या तंत्रज्ञानाचा उपयोग करून कलेला नवी दिशा देत आहेत.**

**साक्षी पांचाळ**

"कला म्हणजे स्वतंत्र विचार, खरंच मनापासून लिहावंसं वाटेल तेव्हाच कागदावर उतरवायचं; डिजिटल युगात कलेचे स्वरूप बदलले असले, तरी तिचे महत्त्व कमी झालेले नाही, हाच माझा बालपणा पासूनचा अनुभव" हे शब्द आहेत बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे धनी, ठाण्यातील युवा कलाकार अजय पाटील यांचे. अभिनेता, दिग्दर्शक आणि लेखक म्हणूनओळखले जाणारे अजय पाटील कलेकडे केवळ व्यवसाय म्हणून नव्हे, तर एक जीवनदृष्टी म्हणून पाहतात. अजयपाटील यांचा बालपणापासूनच कलेशी जवळचा संबंध राहिला आहे. शाळेतील नाटकांपासून ते एकांकिकांपर्यंत, त्यांनी विविध माध्यमांतून आपल्या कलागुणांना वाव दिला. त्यांच्या या प्रवासात त्यांना अनेक पारितोषिकांनी सन्मानित करण्यात आले आहे. १०० हून अधिक पारितोषिके जिंकणारे अजय पाटील हे २५ हून अधिक एकांकिकांचे लेखक आणि१५ हून अधिक एकांकिकांचे दिग्दर्शक आहेत.

होणार सून मी ह्या घरची (२०१५), राजा राणीची ग जोडी (कलर्स मराठी), लक्ष्य (स्टार प्रवाह), फुलपाखरू (२०१९) आणि माझी माणसं (२०२२, सोनी मराठी) यांसारख्या लोकप्रिय मालिकांमध्येही त्यांनी आपल्या अभिनयाची छाप सोडली आहे. तुझं माझं सपान(२०२३, सोनी मराठी) या मालिकेत त्यांनी खलनायकाची मुख्य भूमिका साकारली.आज लेखनावर कॉर्पोरेट जगाचा वाढता प्रभाव जाणवतो. लेखकांना विशिष्ट चौकटीत राहून लिहिण्याची सक्ती होते,ज्यामुळे त्यांच्या मूळ कल्पना आणि दृष्टिकोन मागे पडतात. परिणामी, लेखनात मौलिकतेचा अभाव दिसून येतो आणि ते केवळ व्यावसायिक उद्दिष्टांपुरते मर्यादित राहते. अनेक लेखक इतरांच्या कल्पनांची नक्कल करतात किंवा त्यांच्या प्रभावाखाली लिहितात, ज्यामुळे नाविन्य लोप पावते. लेखकांनी स्वतःचा आवाज शोधून, स्वतःचा दृष्टिकोन मांडणे आवश्यक आहे. लेखन हे अंतर्मनातून आले पाहिजे. तीव्र इच्छा आणि ओढ असेल तेव्हाच ते केले पाहिजे. केवळ व्यवसायासाठी किंवा पैशांसाठी केलेले लेखन प्रामाणिक नसते. नाटकांबद्दल पाहायला गेले तर नाटकांचे कथानक कदाचित कॉपी केले जाऊ शकते, परंतु त्याची मांडणी, अभिनय आणि दिग्दर्शन मूळ नाटकासारखे कधीच होऊ शकत नाही. नाट्यगृहात बसून मूळ नाटक पाहण्याचा आनंद वेगळाच असतो, जो टीव्ही किंवा मोबाईलवर नाटक पाहिल्याने मिळत नाही.



**अजय पाटील**

अजय पाटील हे या क्षेत्रातील बदलांना सामोरे जात आहेत आणि नाट्यकलेची मूळ भावना जिवंत ठेवण्यासाठी सतत प्रयत्नशील आहेत. ते स्वतःच्या लेखनातून आणि दिग्दर्शनातून समाजाला एक वेगळा दृष्टिकोन देण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांच्या मते, कलाकारांनी स्वतःचा आवाज शोधून, समाजातील समस्या आणि प्रश्नांना




कलेच्या माध्यमातूनमांडले पाहिजे.

कला ही सतत प्रवाहित नदी सारखी आहे, जी काळाच्या ओघात नवनवीन रूप धारण करते. प्रत्येक पिढी आपले अनुभव, विचार आणि दृष्टिकोन मिसळून तिला अधिक समृद्ध करते. आजची तरुण पिढी तंत्रज्ञानाचा वापर करून कलेला एक नवीन आयाम देत आहे. अजय पाटील यांच्यासारखे कलाकार या प्रवासात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. ते तरुण पिढीला प्रेरणा तसेच एक नवी दिशा देत आहेत आणि कलेची पारंपरिक व्याख्या बदलत आहे ज्यामुळे ती अधिक व्यापक होत चालली आहे.

डिजिटल आर्ट, व्हिडिओ आर्ट आणि इतर आधुनिक कला प्रकारांमध्ये त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. तंत्रज्ञानाने कलाकारांना नवनवीन माध्यमे उपलब्ध करून दिली आहेत. ज्यामुळे ते अधिक प्रभावी कलाकृती तयार करू शकतात.डिजिटल आर्ट, 3D प्रिंटिंग, व्हर्च्युअल रिॲलिटी यांसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून कलाकार अधिक आकर्षक आणि विचारप्रवर्तक कलाकृती निर्माण करत आहेत. इंटरनेट आणि सोशल मीडियामुळे कलाकारांना जगभरातील लोकांशी संपर्क साधणे सोपे झाले आहे. ते आपली कलाकृती जगभरातील लोकांपर्यंत पोहोचवू शकतात आणि विविध संस्कृतींशी संवाद साधू शकतात. या बदलांमुळे कला अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचत आहे आणि तिचा प्रभाव वाढत आहे.

अजय पाटील यांच्यासारखे कलाकार या प्रवासात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. ते तरुण पिढीला प्रेरणा देत आहेत आणि कलेला एक नवी दिशा देत आहेत. त्यामुळे कला केवळ मनोरंजनाचे साधन न राहता, विचारांना चालना देणारी आणि समाजाला दिशा दाखवणारी शक्ती बनत आहे.

## या गोकुळात आता तुझं असं काही उरलं नाही

आधी तुझ्या खांद्यावर डोकं टेकवून
यमुनेच्या काठावर बसणारी राधा,
आता एकटीच यमुनेच्या काठावर बसून
तुमच्या आठवणींमध्ये डोकावते.

एकदा त्या काठावर जाऊन बघ....
तुझ्या आठवणीत निघणारं
डोळ्यातलं पाणी अजून मुरलं नाही.

या गोकुळात आता....
तुझं असं काही उरलं नाही.

**- अजय पाटील**

# जो गीत नही जन्मां, वो गीत बनायेंगे..



**सवाई गंधर्व भीमसेन महोत्सवात आपल्या गायनाने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या, आणि देशभरातील अनेक मानाच्या महोत्सवांमध्ये आपली कला सादर करणाऱ्या शास्त्रीय गायिका शश्वती चव्हाण यांच्याशी केलेली ही खास मुलाखत. आज त्यांनी शास्त्रीय संगीतात आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.**

**इरा सोनावणे**

**जो गीत नही जन्मां, वो गीत बनायेंगे..**
**तेरे सुर मे सुर मिलाकर, संगीत बनायेंगे...!!**

माननीय पद्मश्री पु. ल. देशपांडे यांनी एक वाक्य म्हटलेले आहे की," उपजीविकेसाठी आवश्यक असणाऱ्या विषयांचं शिक्षण जरूर घ्या, पोटापाण्याचा उद्योग जिद्दीने करा, पण एवढ्यावरच थांबू नका. साहित्य चित्र, संगीत, नाट्य, खेळ अशा कलेशी मैत्री जमवा. पोटापाण्याचा उद्योग आपल्याला जगवेल, पण कलेशी जमलेली मैत्री तुम्हाला का जगायचं हे सांगून जाईल..." अशाच कलेमधील संगीत व गायन क्षेत्रात आपला ठसा उमटवून यशस्वी झालेल्या शाश्वती चव्हाण यांची यशोगाथा आज आपण त्यांच्याकडून ऐकणार आहोत.

## थोडक्यात परिचय

नुकत्याच संपन्न झालेल्या सवाई गंधर्व भीमसेन महोत्सवात आपल्या गायनाने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या, आणि देशभरातील अनेक मानाच्या महोत्सवांमध्ये आपली कला सादर करणाऱ्या शास्त्रीय गायिका शश्वती चव्हाण यांच्याशी केलेली ही खास मुलाखत. पुणे शहरात जन्मलेल्या शश्वती यांनी वयाच्या चौथ्या वर्षापासूनच आपल्या वडिलांच्या, ज्येष्ठ शास्त्रीय गायक पंडित सुधाकर चव्हाण यांच्या पावलावर पाऊल ठेवून गायन क्षेत्रात प्रवेश केला. आज त्यांनी शास्त्रीय संगीतात आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. सध्या त्या किराणा घराण्याचे SNA पुरस्कार विजेते उस्ताद अर्शद अली खान, उस्ताद मश्कूर अली खान आणि उस्ताद मुबारक अली खान यांच्याकडून गायनाचे धडे घेत आहेत. एसएनडीटी कॉलेज, पुणे येथून सुवर्णपदक मिळवलेल्या शश्वती सध्या शास्त्रीय गायनात पीएचडी करत आहेत. या मुलाखतीत, त्यांच्या संगीत प्रवासातील अनुभव, प्रेरणा आणि त्यांनी शास्त्रीय संगीताच्या जगात स्वतःची एक खास ओळख कशी निर्माण केली, याबद्दल जाणून घेऊया.




**डिसेंबर २०२४ मध्ये सवाई गंधर्व भीमसेन महोत्सवात गायन करताना शाश्वती चव्हाण**

### ? तुमच्या गायनाची सुरुवात कधी आणि कशी झाली ?

माझ्या गायनाची सुरुवात घरातूनच झाली. वयाच्या तिसऱ्या वर्षी वडिलांकडून गाणं शिकायला सुरुवात केली. कोणताही खास क्लास नव्हता, वडिलांच्या क्लासमध्येच शिकले. वयाच्या पाचव्या वर्षी पहिला स्टेज परफॉर्मन्स दिला. लहानपणापासूनच स्टेजची भीती



नव्हती.वडिलांचे ज्येष्ठ विद्यार्थी शिवानंद स्वामी यांच्याकडून अनेक वर्षे प्रशिक्षण घेतले. २०१३ मध्ये अर्शद अली यांचे गाणे ऐकले आणि त्यांच्या गाण्याच्या प्रेमात पडले. जानेवारी २०१४ पासून त्यांच्याकडे प्रशिक्षण घेत आहे. किराणा घराण्याच्या दोन गायकी शैलींपैकी एक वडिलांकडून आणि दुसरी त्यांच्याकडून शिकले.दहावी झाल्यावर गायनातच करिअर करायचे ठरवले. २०१५ पासून हर्षद अली खान, उस्ताद मशकूर अली खान, उस्ताद मुबारक अली खान यांच्याकडून शिकत आहे. ललित कला केंद्र, पुणे येथे बीए इन म्युझिक केले. एसएनडीटी कॉलेज, पुणे येथे एमए केले, जिथे गोल्ड मेडलिस्ट आहे. सध्या एसएनडीटी कॉलेजमधून पीएचडी करत आहे. रोज ७-८ तास रियाझ आणि तालीम करते. शास्त्रीय गायनात कोणतेही अंतिम ध्येय नाही, त्यामुळे मनन, चिंतन आणि रियाझ चालू ठेवावा लागतो. हा प्रवास सतत चालू असतो.

### ? नुकतेच डिसेंबर २०२४ मध्ये सवाई गंधर्व भीमसेन महोत्सव येथे तुम्ही आपली कला सादर केली, त्याबद्दल काय सांगाल ?

खूप, खूप emotional moment होता तो माझ्यासाठी, आणि सर्वात आनंदाचाही क्षण. लहानपणापासून सवाई गंधर्व मध्ये ऐकायला येते आणि तेव्हा पासूनच एक स्वप्न होतं इथे गायला मिळेल. आणि ती संधी मला मिळाली त्यासाठी मी आर्य संगीत प्रसारक मंडळ यांची मी खूप आभारी आहे.लहानपणी माझी आई म्हणाली होती की तुला इथे गायचे आसेल तर तुला खूप रियाज करावा लागेल. कारण मी नेहमी म्हणायचे की कधी न कधी तरी ह्या मंचावर मला गायचे आहे. ती संधी मला मिळाली आणि तो क्षण माझ्यासाठी खूप अगणित आनंदाचा होता. म्हणजे मी कधी तो आनंद मोजूच नाही शकत.माझे आई बाबा, सर्व गुरु, सगळेच खूप खुश होते, आणि ती वेळ जणू की। was speechless. एकाच वेळेस happy, emotional, जास्त बोलता येत नव्हतं, शब्द सुचत नव्हते.पण सवाई मध्ये गाण्याचं स्वप्न जरी पूर्ण झालं तरी गाण्याचा प्रवास थांबत नाही. कुठलीतरी मोठी अचीवमेंट झाली की गाणं झालं असं नाहीये. ही achievement is a fruit of that hard work पण हा प्रवास चालूच राहणार आणि तोच सर्वात जास्त आनंद देणारा आहे.

### ? स्पर्धात्मक युग असताना गायन क्षेत्र हे कसे निवडले ?

जसं मी म्हणाले लहानपणापासून मला गाण्याची आवड. खरंतर माझे वडील पंडित सुधाकर चव्हाण शास्त्रीय गायक आहेत.माझ्या घरात मी त्यांना लहानपणापासून पाहत आले. आणि माझ्यासाठी ते

आजही खूप मोठे inspiration आहेत. माझ्या बाबांनी खूप कष्टातून शिकून हे सगळं केलंय, खूप संघर्ष केलाय. त्यांच्यामुळे मला ह्या सगळ्या गोष्टी मिळाल्या. त्यांनी struggle आणि Hard work पण केलंय. पायात चप्पल नव्हती जेव्हा ते संगीताच्या ध्यासापायी पुण्यात आले. ते माझ्यासमोर खूप मोठे role model होते की मी लहानपणापासून हेच म्हणाले की मला माझ्या वडीलांसारखाच शास्त्रीय गायक बनायचं आहे. त्यामुळे मी कधी वेगळा विचारच केला नाही की मी कुठल्या दुसऱ्या करिअरमध्ये जाईल. मला सायनस चा त्रास असल्यामुळे मी दहावीला असताना मला बरेच suggestions आले की तू हे career करू शकत नाही पण गायनातून मला आनंद मिळतो, माझ्यासाठी तो महत्त्वाचा आहे आणि मी गण्याशीवय सुखी राहू शकत नाही. माझ्या आयुष्यात मला माझ्या भावाचा खूप मोठा पगडा आहे, impact आहे. त्याने मला शिकवलं की गाणं कसं ऐकायचं आणि काय विचार करायचा. आणि still I'm doing my best. मी ठरवलं की मला गाता येईल की नाही येणार हा माझ्यासाठी नंतरचा प्रश्न आहे पण माझं मन यात रमते. माझा प्रवासच माझ्यासाठी सर्वात समाधानकारक असेल. त्यामुळे मी अजून हे करत राहणार आहे, अजून भरपूर करायचंय. म्हणून स्पर्धात्मक योग जरी असला तरी माझ्यासाठी दुसरा ऑप्शन मी काही ठेवलाच नाही.

### ? तुम्ही सांगितल्या प्रमाणे ही जी आपली कलाश्री संगीत अकॅडमी आहे, यामध्ये कोणत्या वयापासून चे मुले मुली सहभाग घेतात ? आणि यामध्ये कोण कोणते गायन व वाद्य प्रकार शिकवले जातात ?

कलाश्री जी संस्था आहे ती गेले 27 वर्षांपासून चालत आहे. या यामध्ये आपण वयाच्या पाचव्या वर्षी पासून च्या मुलांना शिकवायला सुरुवात करतो पण जे मुलं लहानपणापासून चांगलं बोलू शकत असतील, गात असतील, बसू शकत असतील व त्यांना समजत असेल तर त्यांना आपण ५ वर्षांपेक्षा कमी असलेल्या मुलांनाही शिकवतो. कलेला कुठली ही age limit नाही. त्यामुळे आपण फक्त लहान मुलं नव्हे तर मोठी माणसं व स्त्रिया यांनाही संगीत शिकवतो. गायन मध्ये आपण mainly शास्त्रीय संगीत शिकवतो. वर्षातून आपले चार मोठे events होतात, गुरौर्णिमेचे programs होतात. त्यात आपण लहान पासून मोठ्यांना सर्वांना stage देतो. गाण्याची संधी देतो. शास्त्रीय संगीताचे संस्कार त्यांच्यावर होतात. आणि वाद्य प्रकारांमध्ये आपण harmonium आणि tabla शिकवतो.



### ? तुमच्या या प्रवासात एखादा प्रसंग किव्हा अविस्मरणीय आठवण, या बद्दल सांगाल काय ?

माझ्यासाठी माझ्या आयुष्यातला एक अविस्मरणीय क्षण असा आहे की, खरं तर अर्शद आली खान यांना मी खूप adore करते. He is like a God for me. त्यांची जी कला आहे, त्यांचे सुर आहेत, सुर हाच ईश्वर आहे हेच मी मानते. तर अर्शद आली खान जेव्हा पण पुण्यात येतात, तेव्हा आमचाच घरी येतात. एकदा ते आले होते आणि ते गात होते तानपुरा लाऊन त्यांचा एक favourite राग पुरिया कल्याण. त्यांच्या मुळे माझा पण तो राग favourite झाला. ते गात असताना जवळ पास १ तास त्यांचा तो रियाझ चालू होता. मला कळलंच नाही की माझ्या डोळ्यांतून पाणी येतय. माझा स्वभाव असा की मला कोणासमोर कधी रडता येत नाही. पण तिथे जवळ पास २०-२५ लोकं बसली होती आणि without mic ते गात असल्यामुळे त्यांचा real original sound येत होता. मी पूर्णपणे विसरून गेले की मी एक मनुष्य आहे, मला दोन हात आहेत, पाय आहेत. त्या स्वरांमध्ये मी हरवून गेले होते. जसं ते संपल मला माझ रडणं control झालच नाही. ते ना आनंदाश्रू, ना दुःखाचे अश्रू. जसा एखाद्या भक्ताला देव समोर दिस्तो, माझं तसं झालं होतं. होतं. ते नंतर माझ्याशी बोलायला आले आणि मी माझं डोकं त्यांचा पायावर ठेवलं. हा दैवी experience मी कधीच केला नव्हता. आणि त्यातून पण त्यांनीच मला शांत केलं, मी त्यांना त्यांचा लहान बहिणी सारखी आहे. त्यांनी तिथे joke केला की "मैं इतना बुरा गाया क्या ?" आणि मग तेव्हा मी शांत झाले.मी इतके वर्ष रियाझ करते, गाणं ऐकते शिकते. तो दिवस, तो क्षण मी कधीच विसरू शकत नाही. तो यासाठी की मी इतकी कबिल झाले की मी त्या स्वरांची, त्या गायकी ची depth जणू शकले. आणि इतक्या वर्षांचा रियाझाच मला ते फळ मिळालं. हेच माझ्यासाठी खूप मोठं भाग्य आहे. आणि अजूनही मी सांगते तर माझ्या अंगावर काटा येतो.

It was an unforgettable moment for me.

## आजच्या काळात शास्त्रीय गायन हे तुम्हाला का महत्त्वाचं वाटतं?




मला अस वाटतं की शास्त्रीय गायन हे आजच्याच काळात नाही तर प्रत्येत काळात महत्त्वाचं आहे. कारण it is an abstract art. आणि मनुष्याला abstract गोष्टीबद्दल जाणून घ्यायला कायम कुतूहल वाटलं आहे आणि शास्त्रीय संगीत हा खूप चांगला मार्ग व्यासंग करण्यासाठी. दुसरी महत्त्वाची गोष्ट की, कला ही नेहमी आपले emotions express करायला खूप मदत करते.मला चांगलाच आठवतं की कोरोनाच्या काळात माझ्या कानावर बऱ्याच अशा गोष्टी पडल्या की कोणाच्या घरात वाद आहे तर कोणाचे प्problems सुरू आहेत. फार वाईट वाटलं त्या काळात जे काय घडलं. अनेकांचे घरात मतभेद होतात पण मला personally विचारलं तर माझ्याकडे माझी कला होती, मला त्यातनं व्यक्त होता येत होतं. आणि स्वरांमधून व्यक्त होण्यासारखं दुसरं कुठलंच माध्यम नाही असं मला वाटतं. आणि ती ताकद शास्त्रीय संगीतात आहे. It is true that where words fail, music speaks. So this is the thing की मला शास्त्रीय संगीत हे महत्त्वाचं वाटतं. And the classical musicians feel blessed and fortunate to feel the magic of it.

## आणि शेवटचा महत्त्वाचा प्रश्न, आजच्या घडामोडी मध्ये मुले mobile, gaming, social media यात जास्त गुंतलेली असतात, तर अश्यामध्ये मुलांचा कल संगीत क्षेत्रात निर्माण होण्यासाठी पालकांनी काय भूमिका घेतली पाहिजे, या बद्दल आपले मत काय?

**आजच्या काळात मुलांच्या आधी पालकांनी स्वतःचा जरा आत्मनिरीक्षण केलं पाहिजे. पालक स्वतःच mobile घेऊन बसतात. हे social media, mobile यात गुंतलेले असतात आणि आपल्या मुलांना आश्वासन करीत की तुम्ही अस अस नाही करायचं. मुलं आपल्या पलकांचेच अनुकरण करतात. पालकांनी स्वतःच शास्त्रीय संगीत शिकायला सुरुवात केली तर मुलं ही त्यांचं अनुकरण करून शिकतील. कमीत कमी घरात त्यांचा कानावर तरी हे पडेल. आपल्या कलाश्रित अनेक लोक येतात की त्यांच्यासोबत त्यांना ऐकून त्यांचे मुलं सुद्धा आता बसायला लागले आहेत. तर हे होऊ शकतं की आधी पालकांनी स्वतःला सवय लावावी आणि मुलं ते बरोबर capture करतील.**

# ती महिला अध्यक्षा झाली...!



**तारा भवाळकर, एक संवेदनशील लेखिका आणि विचारवंत, ज्यांनी आपल्या लेखणीतून समाजातील दुर्लक्षित घटकांच्या वेदनांना वाचा फोडली. त्यांच्या लेखनात स्त्री जीवनातील संघर्ष, सामाजिक विषमता आणि मानवी नातेसंबंधांतील गुंतागुंत अत्यंत संवेदनशीलपणे मांडली जाते. त्यांच्या शब्दांतून एक हळवी, पण तितकीच प्रखर सामाजिक जाणीव जाणवते.**

**मानसी ठाकूरदेसाई**

एक स्त्री अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची अध्यक्षा झाली, हे महत्वाचं नाही तर गुणवत्ता हा महत्वाचा विषय आहे असं परखड मत मांडणाऱ्या ज्येष्ठ लोकसाहित्यिका डॉ. तारा भवाळकर यांची ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात अध्यक्षपदी नियुक्ती झाल्यानंतर उद्घाटन प्रसंगी अध्यक्षीय भाषणात त्यांनी सर्वांचेच मन जिंकली.आजवर मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी,महिला अध्यक्ष या केवळ चर्चा झाल्या. त्यातही भवाळकर यांच्या आधी सर्व नियुक्त्या या निवडणूक प्रक्रियेने पार पडल्या.महामंडळ अस्तित्वात येण्यापूर्वी कुसुमावती देशपांडे या एकच स्त्री अध्यक्ष झालेल्या होत्या. महामंडळाच्या स्थापनेनंतर दुर्गा भागवत, शांता शेळके, विजया राजाध्यक्ष, अरुणा ढेरे या चार स्त्रिया संमेलनाध्यक्ष झाल्या आहेत.

यानंतर जेव्हा तारा भवाळकर यांच्याकडे अध्यक्ष पद आलं. त्यावेळी त्या म्हणाल्या,आयुष्याच्या उतरार्धाच्या टोकावर अपघाताने अध्यक्षपदाचे मिळाले, यावेळी साहित्य संमेलनासाठी जर निवडणूक असती तर कदाचित माझी निवडच झाली नसती.यावेळी प्रथमच निवडणूक नव्हे तर निवड पध्दत साहित्य मंडळाने अवलंबल्याने माझी निवड झाली.मराठी भाषिकांचे प्रेम हा प्रत्येकाचा सन्मान आहे.ज्यांनी मराठी भाषा टिकवली,वाढवली अशा सर्वाचाच हा सन्मान आहे.




डॉ.तारा भवाळकर हे एक महत्त्वपूर्ण नाव आहे जे लोकसाहित्य आणि मराठी साहित्याच्या क्षेत्रात प्रसिद्ध आहे. त्यांचा योगदान केवळ साहित्यिकच नाही, तर संस्कृतीच्या संवर्धनासाठी देखील खूप मोलाचा ठरला आहे. त्यांनी आपल्या लेखनाने लोककलेला एक वेगळं वळण दिलं, आणि त्या वळणावर चालत त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका आकारली.

तारा भवाळकर यांचा जन्म एक साध्या कुटुंबात झाला. त्यांना लहानपणापासूनच साहित्य, संगीत, नृत्य आणि लोककला यामध्ये विशेष आवड होती. त्यांनी आपल्या लेखनाची सुरुवात लोककलेतील अनुभवांपासून केली, ज्यामुळे त्यांनी सामान्य माणसाच्या आयुष्याची सुसंस्कृत आणि मोलाची दृष्टी उचलली. त्यांचे लेखन खूपच गहिरं, संवेदनशील आणि सामाजिक सुधारणांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे.

तारा भवाळकर यांचे कार्य विशेषतः लोकसाहित्य क्षेत्रात महत्त्वाचे ठरले आहे. त्यांनी ग्रामीण जीवनातील विविध पैलूंवर आणि लोककलेवर लक्ष केंद्रित केले. त्यांच्या लेखनात गावातील लोककला, शेतकरी जीवन, लोकांची मानसिकता आणि त्यांची संघर्षकथा यांचा ठळक पद्धतीने आलेला आहे. त्यांचे काव्य आणि कथा यांमध्ये खूपच गोडवा आणि ताजेपण आहे, जे वाचकांना मनोभावे आकर्षित करते.

## अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड

तारा भवाळकर यांची अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड हा एक महत्त्वाचा टप्पा होता. यामुळे त्यांनी साहित्य जगतात एक वेगळी छाप निर्माण केली. त्या काळातील विविध साहित्यिक वाद आणि विचारधारांना समोर ठेवून तारा भवाळकर यांनी संमेलनाच्या अध्यक्षपदी आपल्या कार्याची जबाबदारी योग्य प्रकारे पार केली.



## मराठी भाषा बोलण्यातून विस्तारली

**विठ्ठल रखुमाई हे आमच्या महाराष्ट्राचं आराध्य दैवत आहे. हे आमच्या उदार संस्कृतीचं दर्शन असल्याचे भवाळकर सांगतात. कांदा मुळा भाजी अवघी विठाबाई माझी लसूण मिरची कोथिंबीर अवघा झाला माझा हरी असे सांगणारे संत सावता माळी यांनी मराठी भाषा टिकवली, माझा मराठीची बोलू कौतुके, परि अमृतातेहि पैजासी जिंक, ऐसी अक्षरे रसिके मेळवीन असे ज्ञानेश्वर महाराजांनी सांगितले, या संतांनी मराठी भाषा जीवंत केल्याचे भवाळकर म्हणतात**

त्यांनी साहित्यिक समतेचा, विविधतेचा आणि सामाजिक समृद्धीचा मुद्दा प्रमुखपणे पुढे ठेवला.

### साहित्यिक दृष्टी आणि समाजकार्य

तारा भवाळकर यांचे साहित्य केवळ वाचनाचा आनंद देणारे नाही, तर ते समाजातील अनेक समस्यांवर प्रकाश टाकणारे आहे. त्यांनी आपल्या लेखनाद्वारे समाजातील असमानता, शोषण, जातिवाद, लैंगिक समानता इत्यादी महत्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली आहे. यामुळे त्यांनी साहित्याला एक साधन बनवले आहे ज्याच्या माध्यमातून त्यांनी समाजात जागरूकता निर्माण केली आहे.

तारा भवाळकर यांचे जीवन आणि कार्य लोकसाहित्याच्या क्षेत्रात एक महत्त्वाचे स्थान घेत आहे. त्यांनी आपल्या लेखनातून लोककलेचे संरक्षण, समाजातील विकृत विचारधारा विरोधी लढा आणि साहित्याच्या महत्त्वाचे शिक्षण दिले आहे. त्यांच्या अध्यक्षपदी साहित्य संमेलनात योगदान हा एक टप्पा होता ज्यामुळे त्यांनी साहित्यिक जगतात आपली महत्त्वाची छाप ठेवली. त्या आजही साहित्याच्या क्षेत्रात प्रेरणा देणारी व्यक्ती मानली जातात.

### भवाळकर यांचा मराठी भाषेकडे पाहण्याचा दृष्टिकोन,

**भाषा ही बोलली तर जीवंत राहते, नुसती पुस्तकात आणि ग्रंथात असून उपयोग नाही असेह तारा भवाळकर यांचं मत,महाराष्ट्राला पाडुंरंगाचे स्मरण करायला लावणारी ही मराठी भाषा आमच्या संतांनी जीवंत ठेवल्याचे त्या सांगतात. मराठी भषा बोलण्यातून विस्तारली आहे, त्यामुळं छत्रपती शिवाजी महाराजांना खेड्यापाड्यातील मावळे मिळाले असेही तारा भवाळकर म्हणतात.**

अशी विचार ठेवणारी "ती" ज्येष्ठ लोकसाहित्यिका, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा, डॉक्टर तारा भवाळकर यांच्या विचारांना, त्यांच्या साहित्यांना, आणि मराठीचा पुरस्कार करताना त्यांनी अनुसरलेल्या प्रत्येक शब्दाला कोटी कोटी प्रणाम!

# अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन उत्साहात संपन्न



**दिल्लीत ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. अभिजात दर्जा मिळाल्यानंतरचे हे पहिले संमेलन असल्याने विशेष महत्त्वाचे ठरले. नामवंत साहित्यकार, कवी, समीक्षक आणि नाटककारांनी या संमेलनात सहभाग घेतला. मराठी भाषेच्या संवर्धनासोबतच नवोदित लेखकांसाठी प्रेरणादायी व्यासपीठ म्हणून संमेलनाने महत्त्वाची भूमिका बजावली.**

**पार्थ संजय उत्तेकर**

दिल्ली येथील विज्ञान भवन येथे ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन नुकतंच मोठ्या उत्साहात पार पडलं. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरचं हे पहिलं साहित्य संमेलन असल्याने, यावर्षीचा सोहळा विशेष महत्त्वाचा ठरला. या ऐतिहासिक संमेलनात अनेक नामवंत साहित्यकार, लेखक, कवी, समीक्षक, आणि नाटककारांनी सहभाग नोंदवला.

हे संमेलन केवळ साहित्यिक सोहळा नसून, मराठी भाषेचा गौरव, तिच्या समृद्ध परंपरेचा सन्मान, आणि नव्या पिढीला प्रेरणा देणारं व्यासपीठ आहे. संमेलनाच्या निमित्ताने मराठी साहित्याच्या विविध अंगांवर सखोल चर्चा झाली आणि साहित्याच्या माध्यमातून समाज बदलण्यासाठीच्या शक्यतांवर विचारमंथन करण्यात आलं.

### मराठी साहित्य संमेलन म्हणजे काय?

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे मराठी साहित्य क्षेत्रातील सर्वात प्रतिष्ठित आणि ऐतिहासिक संमेलन आहे. हे संमेलन दरवर्षी वेगवेगळ्या ठिकाणी आयोजित केलं जातं, जिथे साहित्यप्रेमी एकत्र येऊन मराठी भाषेचा गौरव करतात आणि साहित्याचा प्रसार करण्यासाठी नव्या कल्पनांची देवाणघेवाण करतात.:

**विषय :– कैलास पब्लिकेशन चे अध्यक्ष श्री. के. एस.अतकरे यांच्याशी मराठी साहित्य संमेलनावर चा संवाद. अतकरे साहेब है अध्यक्ष :– मराठी प्रकाशक परिषद पुणे, विश्वस्त:– मराठवाडा साहित्य परिषद छत्रपती संभाजी नगर , माजी विश्वस्त:–अखिल मराठी साहित्य महामंडळ. ( साहित्यकार व प्रकाशकाची मुलाखत )**

### ? दिल्लीतील उद्घाटन समारंभ कसा पार पडला ?

दिल्ली येथील मराठी साहित्य संमेलनाचा उद्घाटन सोहळा अगदी उत्तम चांगला पार पडला पंतप्रधान देखील असते आणि अध्यक्ष तारा भावरकरांचे भाषण अगदी रोखठोक झालं, भाषणे त्यांनी अनेक मुद्देही मांडले त्यामध्ये मराठी भाषेचे संवर्धन सांस्कृतिक एकात्मता नवोदित लेखकांसाठी प्रोत्साहन यासारख्या अनेक मुद्दे होते.

### ? मराठी साहित्य संमेलनाचा थोडक्यात इतिहास व ते साहित्यकारांसाठी आणि प्रकाशाकांसाठी कसे उपयोगाचे ?

मराठी साहित्य संमेलन हे अनेक वर्षांपासून मराठी साहित्यकारांसाठी एक मुक्त व्यासपीठ म्हणून समोर आलेला आहे साहित्य संमेलनामुळे नवीन जुने साहित्यकार एकत्र येतात त्यांना एक व्यासपीठ मिळत मोठी संधी उपलब्ध होते आणि प्रकाशकांसाठी एक मोठं मार्केट ओपन होतं. एक लेखक जिथे जाऊ नाही शकत तिथे त्याची लिहिलेले पुस्तकही जातात व तिथे त्यांना चॅनेल ची आणि मीडियाची एक पब्लिशिंग ही मिळते म्हणून हे लेखकांसाठी आणि साहित्यकारांसाठी अगदी उपयुक्त आहे.

### ? साहित्य संमेलन मराठी भाषेला प्रोत्साहन देण्यासाठी कशी मदत करत आहे ?

मराठी साहित्य संमेलनामुळे एक उत्तम मदत ही मराठी भाषेला मिळत आहे, या वेळेचे साहित्य संमेलन दिल्ली येत होतं. तो एक हिंदी भाषिकांचा पट्टा येतो त्या पट्ट्यातल्या लोकांना आपली भाषा समजेल आणि आपली भाषा त्या लोकांना माहिती व्हायला पाहिजे या उद्देशाने

मराठी भाषेचा प्रसार ही तिथे झाला. आणि त्या भागात मराठी भाषा आहे मराठी साहित्य आहे हे पोचले आणि त्यामुळेच मराठी चा प्रसार करायला साहित्य संमेलन हे खरंच उपयुक्त ठरत आहे.

### ? मराठी साहित्य संमेलन शताब्दी वर्षाकडे वाटचाल करत आहे त्याबद्दल आपले मत?

शताब्दी वर्ष कडे वाटचाल करताना मराठी भाषा व मराठी साहित्य संमेलन हे एकापेक्षा एक आणि दरवेळेस एक नवीन उंचावता गादत आहे असं माझं मत आहे लवकरच शेताब्दी वर्षाला एक नवीन उच्चांक गाठला जाईल व भाषेचा प्रसार होत राहील , शताब्दी वर्षाकडे वाटचाल करताना अनेक नवीन साहित्यकार यामध्ये जुळले जातात आणि मुख्यतः भाषेचा प्रसार हा एका मोठ्या स्तरावर होतोय हे महत्त्वाचं.

### ? साहित्य संमेलन हे दिल्ली येथे पार पडलं याच्यावर अनेक लोकांनी आक्षेप घेतला यावर आपले मत.

दिल्ली येथे साहित्य संमेलन झालं त्याच्या आक्षेपाचा काही कारण नव्हतं . अक्षय पास झाला की जास्त खर्चिक आहे परंतु आपल्या भाषेसाठी आपण जीव ओवाळून टाकतो , आपण बोलतो आपली भाषा टिकायला हवी जर आपण आपल्या देशातच कुठे दुसरीकडे जात नसलो तर आपली भाषा दूरपर्यंत कशी पोहोचेल ? भाषेचा प्रसार कसा होईल? खर्चिक या विषयावर जास्त न बघता भाषेचा एक मोठं काम पडतंय आपण हे पाहिले पाहिजे.

### ? संमेलनामध्ये राजकीय कार्यक्रमांना नेत्यांचा हस्तक्षेप किती योग्य आहे?

साहित्यिक क्षेत्रामध्ये हस्तक्षेप नको त्यांना बोलवायला हवं त्यांचा योग्य तो सन्मान करायला हवा पण ते ढवळाढवळ करणं त्यांच्या सांगण्यासारखं करणं ते चुकीचं आहे ते नको व्हायला हवं.

### ? साहित्य संमेलन सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचावं यासाठी काय करायला हवं?

साहित्य संमेलन सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी आपण साहित्य संमेलन हे लहान गावातही घेतले पाहिजे पुणे मुंबई नाशिक संभाजीनगर नागपूर सोडून उर्वरित महाराष्ट्र मध्ये ही व्हायला हवे हे असे प्रयोग आधीही असे कार्यक्रम झालेत व त्याने सर्वसामान्य जनतेपर्यंत आपल्याला पोहोचता येईल. फक्त मराठी साहित्य संमेलन नसून अजून छोटे-मोठे साहित्य संमेलन हे देखील व्हायला हवेत लेखकाला कादंबरी कार्याला प्रकाशकाला लिहिता येईल ते लोकांपर्यंत पोहोचवता येईल त्यांना त्यांच्याकडून एक प्रशांतचा मिळेल व त्यांनीच जे नवीन साहित्यकार आहेत ते सर्वसामान्य पर्यंत पोहोचण्यासाठी आपल्याला मदतही करू शकतात.

### ? यापेक्षा साहित्य संमेलनामध्ये काय चांगल्या गोष्टी जाणवल्या आणि कशाची कमतरता जाणवली?

या साहित्य संमेलनासाठी मी प्रकाशक म्हणून गेलतो तिकडची स्टॉलची व्यवस्था राहण्याची व्यवस्था ही अगदी उत्तम होती



**दिल्ली येथील मराठी साहित्य संमेलनाचा उद्घाटन सोहळा पंतप्रधानांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.**

त्याचबरोबर स्टॉलवर आलेल्या क्राउडी मोठ्या प्रमाणात होता. यामध्ये आम्हाला आधीच सांगण्यात आलं की बाहेरच्या पट्ट्यामध्ये असल्या कारणाने विक्री कमी होईल परंतु तिथे आम्हाला एक विशेष गोष्ट बघायला मिळाली की आपले इकडचे मराठी बांधव व जे विद्यार्थी तिथे शिकायला गेलेत हे देखील इथे साहित्य संमेलनाला भेट देऊन गेले अनेक विद्यार्थी जीवन दिल्ली युनिव्हर्सिटी मधले होते ती मुलं तिथे आलीच नसून त्यांनी पुस्तकांची खरेदी ही गेली त्या मंडळींच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद होता की आपल्या भाषेचं काम होतं आणि ते चांगलं होतं . खात्री नव्हती परंतु एक चांगला प्रतिसाद आम्हाला तिकडे बघायला मिळाला व दिल्लीमध्ये राहणाऱ्या मराठी भाषिकांचा ही एक चांगला प्रतिसाद आम्ही पाहिला.

### ? दिल्ली येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनामुळे मराठीचे महत्व कसं वाढेल?

नक्कीच 100% वाढेल की जसं हिंदी आणि इंग्लिश पुस्तक वाचणाऱ्या त्या लोकांचा पट्ट्यामध्ये आपण गेलतो परंतु तिथेही एक चांगला प्रतिसाद आपल्याला बघायला मिळाला की तुमचा इतका मोठा कार्यक्रम होतय. तिकडच्या अनेक स्थानिक व हिंदी भाषेतील प्रकाशक ही तिथे उपस्थित होते ते प्रकाशक आपले मराठी पुस्तक तिथून घेऊन गेले ते लोक आलती त्यांनी पाहिलं व मराठी भाषिक इतका मोठ्या प्रमाणात एकत्र येतात आणि दिल्ली सारख्या ठिकाणी एवढं मोठं साहित्य संमेलन पार पडतंय आणि या साहित्य संमेलना मराठी साहित्याची ताकद आपल्याला जगाला दाखवता आली की आपल्या साहित्य काय त्याचा इतिहास किती मोठा आहे. इतकी लोकं एकत्र येतात व आपल्या भाषेचा प्रभुत्व वाढायला दिल्ली येथे साहित्य संमेलन झालं त्यामुळे एकूण मराठी भाषेचाच फायदा झालाय.

कोणतेही भाषेचा एवढा मोठा साहित्य संमेलन होत नाही हे केवळ मराठी भाषेचा संमेलन होतं. मराठी साहित्य हा केवळ शब्दांचा प्रवाह नाही, तर संस्कृतीचा श्वास आहे. आणि हे संमेलन त्या श्वासाला नवचैतन्य देणारं व्यासपीठ ठरलं आहे!

# महाराष्ट्रातील शिल्पकला आणि ऐतिहासिक लेणी



**प्राचीन भारताची सांस्कृतिक आणि धार्मिक धरोहर असलेल्या लेण्यांची वास्तुकला अद्वितीय आहे. बौद्ध, हिंदू आणि जैन धर्माच्या विविध संरचनांमधून भारतीय इतिहासाची एक अनमोल झलक दिसते. अजिंठा आणि वेरूळ लेण्यांमधील कला, शिल्प आणि स्थापत्यशास्त्र पर्यटकांना आजही आकर्षित करतात.**

**श्रावणी कांबळे**

लेणी म्हणजे डोंगर, टेकडी, पर्वत, आणि खडक कोरून तयार केलेली गुहा. या लेण्यांचा मुख्य वापर सन्यासी आणि भिखूंनी तपस्या साधनेसाठी किंवा विश्रांती घेण्यासाठी केला जात होता. प्रामुख्याने, सातवाहन आणि राष्ट्रकुट रजवटींच्या काळात लेण्यांची कोरणं झाली होती. महाराष्ट्रातील प्रमुख लेण्यांमध्ये अजिंठा, वेरूळ, कार्ले, कान्हेरी, घारापुरी, आणि पितळखोरे यांचा समावेश आहे. या लेण्यांमध्ये चैत्यगृहं, विहार, आणि मंदिरे देखील आहेत. प्रारंभात या लेण्यांमध्ये साधेपणाने कोरलेली संरचना असली तरी, पुढे जाऊन त्यामध्ये शिल्पं आणि मूर्त्या कोरली गेली. लेण्यांच्या भिंतींवर चित्रंही कोरून त्यांना सुशोभित केलं गेलं. काही लेण्यांना शैलगृहे किंवा शिला मंदिरे असंही म्हणतात.

आज भारतभर सुमारे एक हजार लेण्यांची माहिती आहे. त्यापैकी शंभर लेणी हिंदू आणि जैन धर्माशी संबंधित आहेत, तर उरलेली ९०० लेणी बौद्ध धर्माशी संबंधित आहेत. लेणी या शब्दाचा उपयोग सामान्यतः मानवनिर्मित गुहेसाठी केला जातो. अष्मयुगीन काळात मानवाचा वास नैसर्गिक गुहांमध्ये होतो. प्रारंभात कोरलेली लेणी साधारणतः डोंगराच्या पायथ्याशी असत, आणि त्या लेण्यांच्या आकारमानात साधेपण असायचं.

भारताच्या विविध धर्मांमध्ये लेण्यांचा उपयोग होता, परंतु त्यात मुख्यतः धार्मिक आणि ऐहिक उद्देशांसाठी असलेल्या लेण्यांचा प्रचलन होता. बौद्ध लेण्यांमध्ये चैत्यगृहं आणि विहार असतात, तर जैन लेण्यांमध्ये मुख्यतः विहार पाहायला मिळतात. वैदिक आणि हिंदू लेण्यांमध्ये देवालयं आणि प्रसाद असतात. या सर्व लेण्यांमध्ये वेरूळ येथील लेणी कलात्मकतेच्या दृष्टीने विशेष आकर्षक आहेत. वेरूळ येथील कैलास मंदिर, हे अद्वितीय शैल मंदिर म्हणून ओळखले जाते. अजिंठा आणि वेरूळ येथील लेणी जगभर प्रसिद्ध आहेत, आणि तेथे दरवर्षी अनेक पर्यटक भेट देण्यासाठी येतात.









## अजिंठा लेणी

अजिंठा लेणी ही भारतीय कलेचा आणि चित्रकलेचा एक जीवंत उदाहरण आहे. या लेण्यांचा समावेश महाराष्ट्रातील छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील अजिंठा डोंगरात आहे. बौद्ध धर्माच्या ऐतिहासिक वारशाची दृष्ये आणि चित्रं अजिंठा लेण्यांमध्ये पाहायला मिळतात. युनेस्कोने अजिंठा लेण्यांना जागतिक धरोहर स्थान म्हणून मान्यता दिली आहे.

अजिंठा लेण्यांमध्ये गौतम बुद्धाच्या विविध मुद्रांतील शिल्पकला पाहायला मिळते, जी त्या काळातील अद्वितीय शिल्पकलेचा एक उदाहरण आहे. या लेण्यांमध्ये वापरलेल्या रंगछटांचे दृष्य पर्यटकांना एक अद्भुत अनुभव देतात. अजिंठा लेणी आता भारतीय पर्यटनाच्या प्रमुख स्थळांमध्ये गणली जातात.


## वेरूळ लेणी

वेरूळ लेणी भारतीय स्थापत्यशास्त्राचं एक अद्भुत उदाहरण आहे. पाचव्या ते दहाव्या शतकाच्या कालखंडात कोरलेली वेरूळ लेणी बौद्ध, हिंदू, आणि जैन या तिन्ही धर्मांच्या लेण्यांचा समावेश करतात. वेरूळ येथील कैलास मंदिर विशेष महत्त्वाचं आहे. या मंदिराची निर्मिती 'आधी कळस, मग पाया' या पद्धतीने केली गेली आहे.

कैलास मंदिराचं वास्तुकलेतील यथार्थ आणि नियोजनबद्ध निर्माण बघून प्रत्येक पर्यटक मंत्रमुग्ध होतो. हे मंदिर साधारणतः 150 वर्षांमध्ये पूर्ण झालं असावं, असं संशोधक मानतात. कैलास मंदिराच्या मध्यभागी असलेल्या शिवलिंगाच्या समोर सुंदर कोरीवकाम केलेले सत्मभ आणि तांडव करत असलेल्या भगवान शिवाचं शिल्प आहे. वेरूळ लेण्यांमधील शिल्पकार्य आणि धार्मिक महत्व पर्यटकांना खूप आकर्षित करतं, आणि हे लेणी भारतीय स्थापत्य आणि शिल्पकलेचं उत्तम उदाहरण आहेत.



# कोपेश्वर खिद्रापूर मंदिर : नंदी नसलेले शिवमंदिर



**शिलाहार स्थापत्य शैलीचे पंधराशे वर्षांपूर्वीचे कोपेश्वर खिद्रापूर मंदिर कोल्हापूर जिल्ह्यातील कृष्णाकाठी वसलेले आहे. मुख्य प्रवेश द्वारातून आत गेल्यावर काळया पाषाणातील हे मंदिर मनमोहून टाकते. प्रदक्षिणेच्या मार्गावर विविध भावनांचे प्रदर्शन करणाऱ्या मानवी आकृती कोरलेल्या दिसतात.**

**गंधार रविंद्र पोतदार**

महाराष्ट्रात शंकराचे असे एक मंदिर आहे, ज्याचा नंदी कर्नाटकात आहे... भारतात स्थापत्य कलेचे अनेक नमुने आढळतात. महाराष्ट्राला हा सांस्कृतिक वारसा लाभला असून अनेक सुंदर शिल्प, लेणी महाराष्ट्रात आहे. यातील एक शिलाहार स्थापत्य शैलीचे पंधराशे वर्षांपूर्वीचे हे मंदिर कोल्हापूर जिल्ह्यातील कृष्णाकाठी वसलेले आहे. मुख्य प्रवेश द्वारातून आत गेल्यावर काळया पाषाणातील हे मंदिर मनमोहून टाकते. पाषाणावर केलेले कोरीव काम मन स्तब्ध करून टाकते. मंदिरात प्रवेश केल्यावर प्रथम आपण स्वर्ग मंडपात येतो. हा मंदिराचा विशेष भाग आहे. हा स्वर्ग मंडप 48 खांबावर उभारला असून आकाशाच्या बाजूने 13 फूट व्यासाचा वर्तुळ आहे. तेवढ्याच व्यासाचा वर्तुळ असलेला गोलाकार दगड खाली आहे. या स्वर्ग मंडपात वर्षातून एकदा त्रिपुरी पौर्णिमे दिवशी चंद्र मध्यभागी वर्तुळात येतो. स्थापत्य कलेचा हा अनोखा नजराणाच.

## नंदी नसलेला सभा मंडप

याची पौराणिक कथा अशी, प्रजापती दक्ष राजाच्या 16 कन्यांपैकी सती ही सर्वात लहान होती. सर्वांच्या विरोधाला न जुमानता तिने शंकराशी विवाह केला. दक्ष राजाला याचा राग होता म्हणून वाजपेयी यज्ञात दक्ष राजाने शंकराला आणि सतीला आमंत्रण दिले नाही. पण सतीने माहेरी जाण्याचा आग्रह धरला. शंकर मानी असल्यामुळे न बोलता गेले नाहीत. म्हणून शंकराने सती बरोबर नंदीस दक्षाच्या घरी पाठवले. माहेरी गेल्यावर सतीला आपल्या पतीचा केलेला अपमान सहन झाला नाही आणि तिने यज्ञकुंडात आत्महुती दिली त्यामुळे नंदी हा कर्नाटकातील येडूर या गावी आहे. शंकराला हा प्रकार समजतात त्यांनी वीरभद्राला आवाहन केले आणि दक्ष यज्ञाचा नाश करायला सांगितले. भगवान शंकरांनी क्रोधनी जटाभूमीवर आढळून क्रोध प्रकट केला म्हणून हे कोपेश्वर मंदिर.



## गाभारा

गाभाऱ्यात प्रवेश केल्यावर दोन लिंगे दृष्टीस पडतात एक कोपेश्वर, दुसरा धोपेश्वर जो विष्णू प्रतीक आहे. **(पान २९ पाहा)**

# लोणार सरोवर : निसर्गाचा अद्वितीय चमत्कार आणि वैज्ञानिक आश्चर्य



**लोणार सरोवर हे केवळ एक सरोवर नसून, निसर्गाचा अद्भुत चमत्कार आहे. याठिकाणी विज्ञान, निसर्ग, इतिहास आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम दिसून येतो. लोणार सरोवराबरोबरच लोणार धार, सिंदखेडराजा आणि शेगाव ही ठिकाणेही पर्यटन, ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्वामुळे पर्यटकांना आकर्षित करतात.**

**जिवन रामकिसन बोडखे**

लोणार सरोवर हे भारतातील महाराष्ट्र राज्यामधील बुलढाणा जिल्ह्यात मेहकर तालुक्यातील खाऱ्या पाण्याचे जगातील तिसऱ्या क्रमांकाचे सरोवर आहे. याची निर्मिती फार वर्षापूर्वी एका उल्कापातामुळे झाली.हे एक प्रसिद्ध सरोवर आहे. जगभरातील खाऱ्या पाण्याच्या सर्वात मोठ्या क्रेटर सरोवरांपैकी एक आहे. हे सरोवर सुमारे ५०,००० वर्षांपूर्वी निर्माण झाले आहे आणि आजही वैज्ञानिक, निसर्गप्रेमी, तसेच धार्मिक प्रवाशांसाठी एक आकर्षण केंद्र आहे सरोवराचा आकार काहीसा अंडाकृती सारखा आहे. जगभरातून मिळालेल्या २२ लाख मतांच्या आधारावर महाराष्ट्रातील ही सात आश्चर्य निवडली गेली आहेत,त्या ७ आश्चर्यपैकी लोणार सरोवर हे एक आश्चर्य ठरले आहे.

लोणार सरोवर हे सुमारे १.८ किलोमीटर व्यासाचे आणि सुमारे १५० मीटर खोलीचे आहे.सरोवराच्या पाण्यात काही दुर्मीळ सूक्ष्मजीव आढळतात,लोणार सरोवराचे उल्लेख अनेक पुराणांमध्ये आणि ऐतिहासिक ग्रंथांमध्ये आढळतात. असे मानले जाते की, भगवान विष्णूने लोणार येथे लवणासुर नावाच्या राक्षसाचा वध केला होता, त्याच्या नावावरुनच या सरोवरास व या परिसरास लोणार हे नाव मिळाले म्हणूनच या ठिकाणाला धार्मिक महत्त्व आहे. सरोवराच्या काठावर मा कमळजा देवी मंदिर, दौलताबाद मंदिर, हनुमान मंदिर, आणि विष्णु मंदिर यांसारखी अनेक प्राचीन मंदिरे आहेत. त्यातील १५ मंदिरे सरोवरात आहेत. तर काही आणखी मंदिरे आजूबाजूच्या परिसरात आहेत.लोणार सरोवराच्या आसपास यादव, चालुक्य आणि सातवाहन काळातील दगडी मंदिरे आणि शिलालेख आढळतात.

**(पान २९ पाहा)**



# ऊस शेतीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव



**ऊस शेती भारत आणि जगभरात मोठ्या प्रमाणावर केली जाते. हे एक महत्त्वाचे नगदी पीक असून साखर, गुळ आणि इतर उत्पादनांसाठी वापरले जाते. पारंपरिक शेतीत हवामान आणि अनुभवावर आधारित निर्णय घेतले जात होते, मात्र आता कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने ऊस शेती अधिक वैज्ञानिक आणि नफ्याची बनली आहे.**

**साहिल तांबेकर**

कृत्रिम बुद्धिमत्ता, स्मार्ट सेन्सर, ड्रोन आणि हवामान अंदाज यांसारख्या तंत्रज्ञानामुळे शेती अधिक अचूक झाली आहे. माती परीक्षण, सिंचन, खत व्यवस्थापन आणि पीक संरक्षण यामध्ये याचा मोठा उपयोग होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता सेन्सर मातीतील नायट्रोजन (N), फॉस्फरस (P), पोटॅशियम (K) आणि आद्रता यांचे निरीक्षण करून शेतकऱ्यांना अचूक माहिती देतात, परिणामी योग्य प्रमाणात खताचा वापर होतो आणि उत्पादन वाढते.

ऊस शेतीत माती परीक्षण हा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. योग्य प्रमाणात पोषणतत्त्वे असतील तरच पीक चांगले वाढते आणि उत्पादन वाढते. कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित सेन्सरद्वारे नायट्रोजन, फॉस्फरस आणि पोटॅशियम यांचे मोजमाप केले जाते. याशिवाय, मातीतील आद्रता, तापमान आणि pH पातळी यांचेही निरीक्षण होते. यामुळे खत आणि पाणी व्यवस्थापन अधिक अचूक होते. पारंपरिक पद्धतींमध्ये संपूर्ण शेतावर समान प्रमाणात खत टाकले जात असे, त्यामुळे काही भागांत खताचा अपव्यय होत असे. मात्र, कृत्रिम बुद्धिमत्ता-सक्षम प्रणाली केवळ आवश्यक ठिकाणी खत टाकण्याचा सल्ला देते, यामुळे उत्पादन वाढते आणि मातीतील पोषणतत्त्वांचे संतुलन राखले जाते.

ड्रोन तंत्रज्ञानामुळे संपूर्ण शेतीचे निरीक्षण करता येते. मल्टीस्पेक्ट्रल इमेजिंगद्वारे मातीतील पोषणतत्त्वे, आर्द्रता आणि पिकाची स्थिती याचे विश्लेषण करता येते. ऊस शेतीतील मोठी समस्या म्हणजे कीटक संक्रमण आणि पीक रोग. पारंपरिक पद्धतीत शेतकरी संपूर्ण शेतावर मोठ्या प्रमाणात कीटकनाशक फवारतात, त्यामुळे खर्च वाढतो आणि पर्यावरणालाही हानी पोहोचते. मात्र, कृत्रिम बुद्धिमत्ता योग्य प्रमाणात आणि आवश्यक भागात कीटकनाशक फवारणीचा सल्ला देते, त्यामुळे खर्च कमी होतो आणि पर्यावरणावर दुष्परिणामही कमी होतात. ऊस शेतीसाठी पाणी व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे आहे. हवामान बदल आणि पाण्याच्या तुटवड्यामुळे ठिबक सिंचनासारखी पद्धती वापरण्याची गरज वाढली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता- सक्षम स्मार्ट सिंचन प्रणाली ऊसाच्या मुळाशी जोडलेल्या असतात, त्यामुळे योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात थेट मुळाला पाणी पुरवले जाते. यामुळे उसाची वाढ चांगली होते आणि पाण्याची बचत होते.



हवामान अंदाजानुसार लवकर किंवा जास्त पाऊस पडणार असेल, तर कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली पाणी देण्याचे प्रमाण कमी करते, त्यामुळे

# AI द्वारे ऊस लागवडीचा प्रयोग



**बारामती येथील विद्या प्रतिष्ठान येथे कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रयोग करून केलेला ऊस लागवडीचा प्रयोग.**

पाण्याचा अपव्यय टाळला जातो आणि शेती अधिक उत्पादनक्षम होते.

कृत्रिम बुद्धिमत्ता हवामानाचा अचूक अंदाज लावण्यासाठी वापरली जाते. प्रगत प्रणाली हवामानाची माहिती गोळा करून संभाव्य नैसर्गिक आपत्तींचे पूर्वानुमान देतात. उष्णतेच्या लाटा, गारपीट, दुष्काळ किंवा अवकाळी पाऊस याचा अंदाज मिळाल्यास शेतकरी योग्य वेळी योग्य उपाययोजना करू शकतात. पावसाळ्यात काही दिवस पाऊस नसेल, तर शेतकरी पाणी व्यवस्थापनाचे वेगवेगळे उपाय अवलंबू शकतात. कृत्रिम बुद्धिमत्ता मॉडेल्स पीक व्यवस्थापनासाठीही उपयुक्त आहेत. हवामान आणि मातीच्या स्थितीनुसार कोणत्या भागात जास्त उत्पादन होईल याचा अंदाज लावता येतो, त्यामुळे शेतकऱ्यांना अधिक आणि चांगल्या दर्जाचे उत्पादन मिळते.

ऊस शेतीत काढणीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता उपयुक्त ठरत आहे. पारंपरिक शेतीमध्ये कधी कधी काढणीच्या वेळी अनिश्चितता असते, मात्र कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालींमुळे शेतकऱ्यांना कधी कापणी करावी आणि त्याचे नियोजन कसे करावे हे समजते. कृत्रिम बुद्धिमत्ता व्यापार आणि विक्री नियोजनासाठीही मदत करते. मागणी आणि पुरवठ्याचे विश्लेषण करून शेतकरी योग्य वेळी उत्पादन विकू शकतात आणि अधिक नफा मिळवू शकतात. कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली बाजारातील बदलांचा मागोवा घेऊन शेतकऱ्यांना कोणत्या पिकांना अधिक मागणी आहे हे सांगतात. यामुळे शेतकरी योग्य पिकांची निवड करून शेतीचे चांगले नियोजन करू शकतात. कृत्रिम बुद्धिमत्ता-सक्षम शेतीमुळे नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण होते. खत आणि कीटकनाशकांचा कमी वापर केल्यामुळे मातीतील जैवविविधता टिकते. तसेच, ड्रोनच्या मदतीने अचूक पद्धतीने कीटकनाशक फवारणी केल्याने पर्यावरणावर दुष्परिणाम कमी होतात.

एकूणच, कृत्रिम बुद्धिमत्ता ऊस शेतीत क्रांती घडवत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने शेतकरी अधिक उत्पादनक्षम आणि नफ्यात राहू शकतात. यामुळे उत्पादनात 40 टक्क्यांपर्यंत वाढ, 30 ते 40 टक्के पाण्याची बचत आणि उत्पादन खर्च 20 ते 40 टक्क्यांनी कमी होण्याची शक्यता आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता मुळे जमिनीची सुपिकता वाढेल आणि भविष्यात शेतकऱ्यांना कार्बन क्रेडिटचा फायदा मिळू शकतो. कापणी अधिक सोपी आणि जलद होईल, ज्यामुळे कार्यक्षमता 35 टक्क्यांनी सुधारेल. कृत्रिम बुद्धिमत्ता मुळे शेतकरी अधिक माहितीपूर्ण आणि अचूक निर्णय घेऊ शकतात.

पारंपरिक पद्धतींच्या तुलनेत कृत्रिम बुद्धिमत्ता-सक्षम शेती अधिक फायदेशीर आणि उत्पादक ठरत आहे. आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारल्याने शेतकऱ्यांना शेतीतील आव्हानांचा सामना करणे सोपे होते आणि त्यांना अधिक नफा मिळतो. त्यामुळे भवित्यामुळे भविष्यात शेती अधिक वैज्ञानिक, शाश्वत आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर होणार आहे.

# तळेगावचे पाच पांडव मंदिर: एक पौराणिक ठेवा



**महाराष्ट्रातील ऐतिहासिक, पौराणिक आणि सांस्कृतिक धरोहरांचा एक अद्वितीय उदाहरण म्हणजे तळेगाव दाभाडे येथील पाच पांडव आणि द्रौपदीचे मंदिर. महाभारतातील पांडवांच्या वनवासातील या खास ठिकाणावर असलेल्या मंदिरात एकत्र पांडव आणि द्रौपदी यांची मूर्तीकला पाहायला मिळते.**

**तनया सुहास धडफळे**

महाराष्ट्र हे ऐतिहासिक, पौराणिक, सांस्कृतिक, आणि शैक्षणिक महत्त्व असलेले राज्य आहे. म्हणूनच, महाराष्ट्राला "महा राष्ट्र" हे गौरवपूर्ण नाव प्राप्त झाले आहे. महाभारतासारख्या ऐतिहासिक आणि पौराणिक गोष्टींच्या पाऊलखुणा या प्रदेशात पावलोपावली दिसतात. पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात स्थित असलेला तळेगाव दाभाडे येथील पाच पांडव आणि द्रौपदीचे मंदिर हे एक अनोखे आणि ऐतिहासिक महत्त्व असलेले मंदिर आहे. भारतात पाच पांडवांसह द्रौपदीचे दर्शन मिळवता येणारे केवळ दोन मंदिरे आहेत, आणि त्यापैकी हे एक आहे.

गावातील लोकांच्या म्हणण्यानुसार, पौराणिक कथांनुसार, द्रौपदीने दिलेल्या एका शितावर भगवान श्री कृष्णाने आपले पोट भरले, आणि त्यामुळे दुर्वास ऋषींचेही पोट काही न खाता भरले, असा उल्लेख आहे. यासोबतच, असेही सांगितले जाते की, पाच पांडव वनवासादरम्यान तळेगावी आले होते, आणि तेथे द्रौपदीने विश्रांती घेतली होती. काही लोकांची अशीही मते आहेत की, पांडवांनीच द्रौपदीला विश्रांती घेता यावी म्हणून हे मंदिर बांधले होते. पूर्वीच्या काळात या मंदिराबद्दल एक आख्यायिका सांगितली जात होती, ज्यात म्हटले जात होते की, द्रौपदी दर सहा महिन्यांनी खुश बदलते. सहा महिने पूर्वेकडे आणि सहा महिने पश्चिमेकडे तोंड करून तिचा दर्शन होतो. या आख्यायिकेने मंदिराचे वेगळेपण अधिकच अधोरेखित केले आहे. याशिवाय, इतर बऱ्याच आख्यायिका देखील सांगितल्या जातात, ज्यात मंदिराच्या ऐतिहासिक आणि पौराणिक महत्त्वाची कल्पनाही समाविष्ट आहे.

मंदिराला प्रवेश करण्यापूर्वी, डावीकडे एक छोटं शिव मंदिर आहे. शिव मंदिरानंतर एक लहान नंदी लक्ष वेधून घेतो. परिसरात



**मावळ तालुक्यातील तळेगाव दाभाडे येथील पाच पांडव मंदिर**

एक वीरगळी आहे, ज्यात तीन भाग आहेत. या वीरगळीच्या खालचा भाग जमिनीत लुप्त झालेला आहे, आणि वरच्या भागात युद्ध प्रसंग कोरले आहेत. त्यात घोडा आणि घोडेस्वार देखील स्पष्टपणे कोरलेले आहेत. त्यानंतर, "श्री पाच पांडव मंदिर" असलेल्या वास्तूत प्रवेश केला जातो. येथे पाच पांडव ओळीने बसलेले आहेत, जणू काही ते पंगतीसाठी बसले आहेत. हे पांडव मांडी घालून नमस्कार मुद्रेत विराजमान झालेले आहेत. सर्व पांडवांची उंची साधारणतः चार फूट आहे. धर्मराज, भीम, अर्जुन, नकुल आणि सहदेव अशी या पाच भाऊंची मूर्त्या असतात. **(पान ३७ पाहा)**

# शिकायला गेलो एक : विनोदी व नातेसंबंध, आणि सामाजिक बदलांचा विचार करणारे नाटक



**द. मा. मिरासदार यांच्या कथांना नेहमीच खुसखुशीत विनोदाची आणि समाजाच्या वास्तवाचं प्रभावी चित्रण करण्याची हातोटी लाभली आहे. त्यांच्या याच शैलीला समकालीन रंग देत अभिनेते प्रशांत दामले व दिग्दर्शक अद्वैत दादरकर प्रेक्षकांसाठी शिकायला गेलो एक हे नवं नाटक घेऊन आले आहेत. शिक्षण, नातेसंबंध आणि समाजाच्या बदलत्या प्रवाहावर भाष्य करणारे हे नाटक हास्यस्फोट आणि अंतर्मुख करणाऱ्या क्षणांचा सुरेख संगम साधते.**

**सुखदा कुलकर्णी**

द. मा. मिराजदार हे उत्तम विनोदी लेखक म्हणून सुपारीचीत आहेत. प्रशांत दामले, लग्न आणि तत्सम विषयांना सोडून एक वेगळा विषय म्हणून द.मां.च्या 'व्यंकूची शिकवणी' या खुसखुशीत कथेवर आधारित अद्वैत दादरकर लिखित दिग्दर्शित 'शिकायला गेलो एक' हे नवं नाटक घेऊन आले आहेत. फक्त त्यांनी एक केलं आहे, की त्या कथेची वन लाईन घेऊन त्यांनी नाटक आजच्या काळात घडवलं आहे. त्यामुळे द. मां.च्या कथेला समकालीनता लाभली आहे.

ख्यातनाम लेखक द.मा. मिरासदार यांच्या कथेतून साकारलेले शिकायला गेलो एक हे नाटक समाजाच्या बदलत्या प्रवाहात नातेसंबंध, मूल्ये आणि शिक्षणाचा वेध घेते. अद्वैत दादरकर यांनी लिहिलेले व दिग्दर्शित केलेले हे नाटक विनोद आणि नाट्याचा उत्तम संगम साधते.




पुण्यातील आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते महेश साने (प्रशांत दामले) यांना एका आमदाराचा खोडकर मुलगा, श्याम सुंदर (हृषिकेश शेलार), याला दहावीची परीक्षा उत्तीर्ण करण्यात मदत करण्याची जबाबदारी दिली जाते. सुरुवातीला श्याम साने गुरुजींच्या शिकवणीला अजिबात गांभीर्याने घेत नाही. मात्र, साने त्याला अनोख्या पद्धतीने शिकवण्याचा निर्णय घेतात.शिकवणीचे तत्वज्ञान बदलून ते श्यामच्या वाईट सवयी हळूहळू दूर करत जातात. या प्रक्रियेत दोघांमध्ये एक नवे नाते निर्माण होते.

पहिला अंक हलक्याफुलक्या विनोदाने भरलेला असून, कॉमेडीच्या सहाय्याने प्रेक्षकांना खळखळून हसायला लावतो. दुसऱ्या अंकात मात्र नाटकाचा सूर गंभीर होतो, जिथे सामाजिक अपेक्षा, जबाबदाऱ्या आणि वैयक्तिक इच्छांमधील संघर्ष उलगडतो. दामले यांचा अभिनय विशेषतः लक्षवेधी असून, त्यांचे एकपात्री प्रसंग प्रेक्षकांना खिळवून ठेवतात. सहाय्यक कलाकारांनीही उत्तम अभिनय साकारला आहे. संगीतकार अशोक पत्की यांचे संगीत प्रसंगानुरूप असून, प्रकाशयोजना आणि सेट डिझाइन कथानकाची पार्श्वभूमी समृद्ध करतात.

एकूणच, 'शिकायला गेलो एक' हे हसवणारे आणि अंतर्मुख करणारे नाटक आहे. सामाजिक नियम, शिक्षक-विद्यार्थी संबंध आणि जीवनातील मूल्यांवर विचार करायला लावणारे हे नाटक प्रेक्षकांना एक वेगळा प्रवास घडवते .

**दिग्दर्शक आणि लेखक :** अद्वैत दादरकर
**संगीत :** अशोक पत्की
**सेट डिझाइन (नेपथ्य) :** प्रदीप मुळे
**प्रकाश योजना :** किशोर इंगळे
**कलाकार:** प्रशांत दामले, हृषिकेश शेलार, सुनील इनामदार, अनघा भगरे, चिन्मय माहूरकर आणि समृद्धी मोहरीर.

# आई नावाची परी.........



**ही कथा प्रांजली नावाच्या एक साध्या, हुशार आणि प्रेमळ मुलीची आहे, जी आपल्या आईसोबत एका छोट्या गावात राहते. प्रांजलीला शाळेत खूप मित्र-मैत्रिणी आहेत, त्यात सई तिची घनिष्ठ मैत्रीण बनते. सईच्या वाढदिवसाच्या निमित्ताने प्रांजलीला आपल्या आर्थिक स्थितीचा विचार येतो आणि ती त्यामुळे अस्वस्थ होते पण तिची आई तिला समजावते की, प्रेम आणि मैत्रीच्या नात्यांमध्ये गरीब-श्रीमंत हा भेद नसतो.**

**अस्मिता हिरवे**

प्रांजली नावाप्रमाणेच प्रांजल स्वभावाची सहावी शिकणारी एक निरागस मुलगी. पाणीदार डोळ्यांची बोलकी अत्यंत हुशार कष्टाळू आणि प्रामाणिक अशी प्रांजली तिच्या आईसोबत एका खेडेगावात राहायची. तिला वडील नव्हते तिची आई लोकांच्या घरची काम आणि शिलाई मशीन चालवून कामे करायची. यात त्यांच्या उदरनिर्वाहासोबत प्रांजलीच्या शिक्षणाचा खर्चही भागवायची. प्रांजली शाळेत अत्यंत हुशार, तिचा वर्गात नेहमी पहिला नंबर यायचा खेळात वक्तृत्व स्पर्धेत निबंधामध्ये इतर कार्यक्रमात प्रांजलीचा नेहमी पुढाकार व सहभाग घ्यायची. आणि ती पहिली सुद्धा यायची. सर्व शिक्षकांची लाडकी अशी प्रांजली अत्यंत गोड अशी मुलगी.

प्रांजली नुकतीच पाचवीच्या वर्गातून सहावीच्या वर्षाला गेली होती. ती दिवसभर शाळेत असायची आणि घरी गेल्यावर आईला मदत करायची. आईला मदत करत करत स्वतःचा अभ्यास सुद्धा करायचा, त्याचबरोबर थकलेल्या आईची काळजी घ्यायची हा तिचा नित्य दिनक्रम होता. ज्याप्रमाणे ती तिच्या शिक्षकांची आईची लाडकी होती त्याचप्रमाणे तिचे खूप सारे मित्र मैत्रिणी होते. ती नेहमी सर्वांना मदत करत असायची. ही अशी हसतमुख प्रांजली सर्वांना आवडायची. शाळा सुरू होऊन नुकतेच काही दिवस झाले होते. प्रांजली सकाळची शाळेत जात होती. तितक्यात शाळेच्या गेटवर तिला एक गाडी येताना दिसली. त्या गाडीतून एक मुलगी खाली उतरली आणि चालत तिच्याकडे आली तिचं नाव होतं सई. सईने हसून तिच्याकडे बघितले प्रांजलीनेही प्रतिसाद म्हणून तिच्याकडे हसून पाहिले. पुढे सईने प्रांजलीला एक प्रश्न केला, ती म्हणाली, "माझं नाव सही आज हा माझा या शाळेतील पहिला दिवस आहे इथे माझी कोणाशीच ओळख नाही मी इयत्ता सहावीच्या वर्गात आहे मला वर्ग दाखवशील का"? प्रांजलीने तिला हसून होकार दिला. आणि म्हणाली "मी सुद्धा इयत्ता सहावीच्या वर्गात शिकते चल मी तुला तिथे घेऊन जाते". आणि मग प्रांजली सईला घेऊन वर्गात गेली आणि वर्ग शिक्षकांशी तिची ओळख करून दिली. त्यानंतर वर्ग शिक्षकांनी सईची ओळख इतर विद्यार्थ्यांना करून दिली. आणि तिला प्रांजली सोबतच बसण्यास सांगितले.

त्यानंतर दररोजच प्रांजली आणि सई एकत्र बसू लागल्या. प्रांजलीच्या गोड आणि बोलक्या स्वभावाच्या सई प्रेमात पडली. आणि त्यांची घट्ट मैत्री झाली त्यानंतर सई आणि प्रांजली एकमेकांच्या जवळच्या मैत्रिणी झाल्या. प्रांजली नेहमी सईची अभ्यासात मदत करायची. सई अभ्यासात इतकी हुशार नव्हती परंतु प्रांजलीच्या सोबत राहून ती सुद्धा मन लावून अभ्यास करू लागली. त्या दोघी एकत्र राहायच्या बोलायच्या खेळायच्या सई ही मोठ्या घरातील मुलगी होती परंतु तिच्यात त्याबाबतचा कधीच गर्व नव्हता. आणि सईचा हाच स्वभाव प्रांजलीला आवडायचा सईला प्रांजलीच्या घरची स्थिती माहित होती पण कधी सईने प्रांजली ला त्यावरून कधी हिणवले नाही. सई कधी कधी प्रांजली सोबत तिच्या घरी जायची तिच्या आईला भेटायची. प्रांजलीची आई सुद्धा सईचा खूप लाड करायची सईला प्रांजलीची आई फार आवडायची. असेच दिवस सरत गेले आणि प्रांजली आणि सईची एकदम घट्ट अशी मैत्री झाली.

एके दिवशी प्रांजली आणि सई दुपारच्या सुट्टीत जेवत असताना तिच्या वाढदिवसाचा विषय काढला.थोड्याच दिवसांनी सईचा वाढदिवस येणार होता. त्यासाठी तिने तिच्या सर्व वर्गमित्र मैत्रिणींना आमंत्रण दिले होते. पण हा विषय एकूण प्रांजली मात्र अस्वस्थ झाली आणि तिने तो विषय टाळण्याचा प्रयत्न केला. ही गोष्ट सईच्या लक्षात आली त्यानंतर घरी जाईपर्यंत प्रांजली अस्वस्थच होती.घरी गेल्यानंतर तिने भात शिजायला घातला. आणि अभ्यासाला बसली. आई अजून कामावरून घरी आली नव्हती ती पुस्तक घेऊन तर बसली पण तिचं लक्ष अभ्यासात लागत नव्हतं. तितक्यात आई घरात आली आणि तिने सर्वत्र पाहिलं तर बाहेर अंधार झाला असून सुद्धा घरात लाईट लागली नव्हती आणि चुलीवर एका बाजूला भात शिजत होता आणि एका बाजूला प्रांजली खिडकीतून बाहेर एक टक लावून बघत होती. आईने घरात येताच लाईट लावली लाईटच्या प्रकाशामुळे प्रांजली दचकून तंद्रीतून बाहेर आली. आणि पुस्तकात डोकं घालून बसली. आईचं तिच्या हालचालींकडे बारीक लक्ष होतं. प्रांजली हे सगळं

तिच्या मनातलं लपवण्यासाठी करते हे आईला लगेच लक्षात आलं. पण तिने प्रांजलीला तात्पुरत काही विचारलं नाही. त्यानंतर आईने तिच आवरून स्वयंपाक बनवन्यासाठी चुलीजवळ येऊन बसली. तिने पाहिलं की चुलीवरचा भात थोडा करपला होता. प्रांजलीला ते लक्षात आल्यानंतर तिने तो भाताचा टोप हातानेच उचलायचा प्रयत्न केला पण टोप गरम असल्याने तिच्या हाताला चटका बसला. आई म्हणाली, "अगं काय करतेस? भाजेल ना, जा तिकडे जाऊन अभ्यास कर आजचा स्वयंपाक मी करते" त्यानंतर आईने स्वयंपाक करायला सुरुवात केली. स्वयंपाक झाल्यानंतर तिने प्रांजलीला जेवायला बोलावले. जेवतानाही प्रांजलीचे लक्ष जेवणाकडे कमी आणि दुसरीकडेच जास्त होते. आई तिच्याकडे लक्ष ठेवूनच होती. जेवण झाल्यानंतर आईने सगळे आवरले त्यावेळी सुद्धा प्रांजली गोष्टीचे पुस्तक वाचत होती पण तिचं त्याकडे लक्षच नव्हतं. जेवण झाल्यानंतर झोपायची वेळ झाली आई हळूच तिच्याजवळ गेली आणि तिला मायेने जवळ घेतलं. आणि म्हणाली "काय बर आहे त्यात गोष्टीच्या? पुस्तकात मला तरी सांग." पण प्रांजलीचे लक्ष तर पुस्तकात नव्हतंच प्रांजलीने तिला पुस्तकातली गोष्ट सांगण्याचा प्रयत्न केला पण ती गोष्ट सांगताना तिचं तत पप होत होत आईच्या ते लक्षात आलं आणि आईने तिला विचारलं, "काय झालं प्रांजू आज अस्वस्थ दिसतेस सांग बघू बरं". प्रांजली म्हटली "आई अगं असं काहीच नाही उगाच विचार करतेस". आणि तिने नजर चोरली. त्यावर आई हसून म्हणाली "अगं प्रांजू मी तुझी आई आहे आणि तू माझं बाळ तू माझ्यापासून लपवतेस तुझ्या चेहऱ्यावरच्या रेशेवरून मी ओळखते तुझ्या मनात काय चाललंय आणि तू मलाच लपवतेस सांग बघू बरं काय झालं". यावर प्रांजली उदास मनाने म्हणाली ,"अग आई काही दिवसातच आपल्या सईचा वाढदिवस येतोय". त्यावर आई म्हणाली, "अगं ही तर आनंदाची गोष्ट आहे तुझ्या लाडक्या सईचा वाढदिवस येतोय आणि तू असं तोंड पाडून बसली आहेस.



". त्यावर प्रांजली म्हणाली, "तसं नाही आई तिने तिच्या वाढदिवसानिमित्त वर्गातील सर्व मित्र-मैत्रिणींना आमंत्रण दिले आहे आणि तुला तर माहीतच आहे सई किती मोठ्या घरातील मुलगी आहे तिचे आई-बाबा किती मोठे लोक आहेत आणि तुला तर माहीतच आहे अशा मोठ्या लोकांत जायची मला किती भीती वाटते अशा मोठ्या लोकांचं राहणीमान कपडे त्यांचे असे मोठे समारंभ यात खूप मोठ्या गोष्टी असतात खूपच झगमगाट असतो आणि आई मला हे नाही आवडत ग मला तिच्या वाढदिवसाला तिच्या घरी नाही जायचं आहे ग तिथे सर्व मोठे लोक येणार तिचे चांगल्या घरातील मित्र मैत्रिणी येणार आणि त्यात मी कशी दिसेल ते लोक माझी हिणवणी करतील ग सई खूप चांगली आहे तिच्या मनात काही नाही तिचे आई-बाबाही खूप प्रेमळ आहेत पण मला अशा तिच्या वाढदिवसाच्या समारंभात जायची लाज वाटते ग त्यामुळे मी जरा अस्वस्थ आहे आई मला नाही जायचं ग तिच्या वाढदिवस समारंभात पण मी नाही गेले तर सई माझ्यावर नाराज होईल माझ्याकडे तिला देण्यासाठी कोणतीच भेटवस्तू नाही ग नाही तिच्या वाढदिवसाला तिच्या घरी जायला माझ्याकडे चांगले कपडे नाहीत आणि यासाठी मला तुला त्रास नाही का द्यायचा त्यामुळे मला तिच्या वाढदिवसाला तिच्या घरी नाही जायचं सईने आज शाळेत हा विषय काढल्यानंतर मी जरा शांत झाले होते" हे ऐकल्यानंतर आई प्रांजली कडे बघतच राहिली. तिला तिच्या बाळाकडे बघून मन भरून आलं. इतक्या कोवळ्या वयात तिच्यात इतका समजूतदारपणा बघून आईला नवल वाटलं. तिने तिच्या बाळाला कुशीत घेतलं आणि म्हणाली, "तू काळजी नको करूस तू अस्वस्थ राहू नकोस आणि सईला दुखवू नकोस तिच्यापासून अंतर ठेवू नकोस याने तिला वाईट वाटेल तू रोज जशी तिच्याशी वागतेस तसंच वागत जा तिला अंतर देऊ नकोस तू आता आराम कर आपण याचं पुढे बघू". त्यानंतर आईने काहीतरी मनाशी निश्चय केला. आणि दोघी झोपी गेल्या त्यानंतर प्रांजली आणि सई दुसऱ्या दिवशीपासून अगोदर सारख्या हसत खेळत राहू लागल्या.

पण प्रांजलीच्या मनात अजूनही त्या गोष्टीसाठी अस्वस्थता होतीच. जसजसा वाढदिवसाचा दिवस जवळ येत होता तसतशी प्रांजली थोडी अस्वस्थ दिसून यायची. वाढदिवसाच्या आदल्या दिवशी संध्याकाळी सई आणि प्रांजली घरी जात असताना सई प्रांजलीला म्हणाली. "उद्या माझा वाढदिवस आहे आणि तू नक्की घरी यायचं सगळ्यांसोबत माझा वाढदिवस साजरा करायचा जर तू नाही आलीस तर मी माझा वाढदिवस साजरा करणार नाही". हे ऐकून प्रांजलीला थोडसं वाईट वाटलं. ती घरी आल्यानंतर अगोदर सारखी थोडी अस्वस्थ राहिली होती .आई घरी आल्यानंतर तिचं लक्ष प्रांजली कडे गेलं आणि प्रांजलीच्या मनातील चल बिचल आणि अस्वस्थता आईच्या लक्षात आली. पण आईने त्यावर तिच्याशी बोलणं टाळलं आणि दोघी जेवून झोपी गेल्या. त्यानंतर वाढदिवसाचा दिवस उजाडला सई आणि प्रांजली नेहमी प्रमाणे शाळेत गेल्या शाळेतून घरी जाताना प्रांजली सईला म्हणाली "अगं आज माझी तब्येत थोडी खराब वाटते त्यामुळे कदाचित मला तुझ्या वाढदिवसाला यायला आज जमणार नाही". हे ऐकल्यावर सई उदास झाली आणि ती प्रांजलीला जाताना म्हणाली, "मग मीही आज माझा वाढदिवस साजरा करणार नाही". हे ऐकल्यावर प्रांजलीला वाईट वाटलं आणि सई तिला काहीच न बोलता तिथून निघून गेली. त्यानंतर प्रांजली उदास मनाने घराच्या रस्त्याकडे

चालत गेली. घरी आल्यानंतर तिने पाहिले तर तिच्या अगोदरच तिची आई आज घरात होती. आईकडे बघून तिने प्रश्न विचारला, "आई तू आज इतक्या लवकर घरी कशी?" त्यानंतर आईने तिला हसून म्हटले "जा अगोदर तुझ आवर बघू मग आपण बोलूया". त्यानंतर प्रांजलीने हात पाय तोंड धुतले आणि ती हात पाय पुसत असताना आई तिच्या जवळ आली आणि आईने तिच्या समोर एक सुंदर फ्रॉक धरला आणि म्हणाली, "हा घे फ्रॉक आणि घाल". त्या फ्रॉककडे प्रांजली काही वेळ विस्मयकारक नजरेनेच पाहत होती. त्यानंतर आई तिला म्हणाली अशी काय बघतेस तुझाच आहे तुझ्यासाठीच आहे. त्यानंतर प्रांजलीने तो फ्रॉक घातला त्या फ्रॉक मध्ये प्रांजली एका छोट्या परी सारखी दिसत होती. त्यानंतर ती आईकडे चुलीपाशी निघून गेली. आईने तिच्यासाठी प्लेटमध्ये गरम गरम शिरा काढून दिला. प्रांजलीला शिरा फार आवडायचा शिरा बघून प्रांजली म्हणाली, "आई काय ग हे हा नवीन ड्रेस काय माझ्या आवडीचा शिरा काय आणि आज तू चक्क एवढ्या लवकर घरी कशी काय?" त्यावर आई प्रांजलीला हसून म्हणाली, "अगं आज तर सईचा वाढदिवस आहे ना? तू तिकडे नाही जाणार?" हे ऐकल्यावर प्रांजलीचा चेहरा पडला. आईने तिला अलगद कुशीत घेतलं आणि म्हणाली "आज माझ्या त्या बाळासोबत या बाळाचा सुद्धा वाढदिवस आहे की आणि माझ्या या बाळासाठीच हा सुंदर फ्रॉक आणि हा गोडाचा शिरा" हे ऐकून प्रांजलीचे डोळे भरून आले. तिने आईला घट्ट मिठी मारली. आणि आईने प्रेमाने तिला शिरा भरवला आई म्हणाली, "अगं कोण मोठं कोण लहान गरीब श्रीमंत असा भेदभाव मैत्रीत नसतो ग सई तुझी खूप जवळची जिवलग अशी मैत्रीण आज जर तू तिच्या वाढदिवसाला गेली नाही तर तिला किती वाईट वाटेल तिने कधीच आपण गरीब आहोत म्हणून आपल्याला हिणवलं नाही किंवा तसं जाणवू ही दिल नाही फक्त तिच्यासाठी तिच्या मनासाठी तिच्या आनंदासाठी तू तिच्या वाढदिवसा ला जाणार नाहीस आणि बाळा लहान मोठ्या श्रीमंताच्या भेदापेक्षा एखाद्याच्या चेहऱ्यावरचा आनंद आपल्यासाठी महत्त्वाचा असायला हवा त्यामुळे आज सई साठी तू तिच्या वाढदिवसाला जायचं ना की आपला कमीपणा लपवण्यासाठी घरी राहायचं बरोबर ना". हे ऐकल्यावर प्रांजली आईच्या कुशीत हमसूहमसून रडू लागली. आईने तिला समजावलं आणि म्हणाली, "अग ये वेडे आजच इतका चांगला दिवस असा रडून घालवणार माझ्या प्रांजूचा पण आज वाढदिवस आहे ना तर माझ्या बाळाला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा". असं म्हणून आईने तिची एक पापी घेतली आणि तिला घट्ट मिठी मारली. त्यानंतर प्रांजलीने तो पूर्ण शिरा संपवला आणि तिच आवरायला निघून गेली. ती छान तयार झाली आणि सईच्या वाढदिवसाला जायला निघाली. तितक्यात आईने तिला थांबवलं आणि कपाटातून दोन मोत्याच्या माळा बाहेर काढल्या त्यातली एक माळ तिने प्रांजलीच्या गळ्यात घातली आणि दुसरी माळ तिला एका छोट्याशा बॉक्समध्ये बांधून तिच्या हातात दिली आणि म्हणाली, "ही भेटवस्तू माझ्या सईला दे". हे बघून प्रांजलीला आणखीनच भरून आलं आई म्हणाली "आज माझ्या दोन्ही बाळांचा वाढदिवस आहे तर माझ्या दोन्ही बाळांसाठी या दोन गोड भेटवस्तू". त्यानंतर प्रांजलीने आईला विचारलं, "आई हे सगळं कसं आणि कुठून केलेस ग तू" त्यानंतर आई प्रांजलीला म्हणाली, "अगं आपल्या सावंतीन काकूने हा कपडा मला दिला आणि मी याचा हा सुंदर फ्रॉक शिवला आणि या दोन भेट वस्तू मी दुकानातून तुमच्या दोघीसाठी खरेदी केल्या. मला माहित होतं की तु मला याविषयी कधीच काही बोलणार नाही पण मी पण तुझी आई आहे मी पण हे जाणून होते आणि यासाठी मी अगोदरच पैसे घेऊन ठेवले होते". हे ऐकल्यानंतर प्रांजली परत रडू लागली आईने तिला समजावलं आणि म्हणाली,"जा पटकन नाहीतर वाढदिवस संपून जाईल". त्यानंतर प्रांजली पळतच तो बॉक्स घेऊन सईच्या घराकडे निघाली तिथे गेल्यानंतर तिने पाहिले. सगळीकडे खूप सुंदर सजावट केली होती खूप सारी लोकं तिथे होती तिची नजर सईला शोधू लागली तर सई तिच्या वाढदिवसाच्या केकपाशी एकटीच चेहरा पाडून बसली होती. त्यानंतर प्रांजली पळत तिच्यापाशी गेली प्रांजलीला पाहून सईचा चेहरा खुलला तिने आनंदात प्रांजलीला मिठी मारली. त्यानंतर वाढदिवसाला सुरुवात झाली. सई सगळ्यांच्या मधोमध होती आणि प्रांजली एका बाजूला जाऊन उभी राहिली ते पाहून सई तिच्या जवळ गेली आणि तिने हाताला धरून प्रांजली ला मधोमध घेऊन आली आणि म्हणाली," आज माझ्यासोबत या माझ्या सगळ्यात जवळच्या माझ्या प्रांजूचा वाढदिवस आहे आणि आम्ही दोघी एकत्र आमचा वाढदिवस साजरा करणार आहोत". हे ऐकून प्रांजलीचं मन भरून आलं मग दोघीजणींनी सईच्या आई-बाबांसोबत मिळून वाढदिवसाचा केक कट केला आणि वाढदिवस साजरा केला. त्यानंतर घरी जाताना प्रांजलीने सई साठी आणलेली मोत्यांची माळ तिच्या गळ्यात घातली हे बघून सईला खूप आनंद झाला. तिने सुद्धा प्रांजली समोर एक भेटवस्तू पकडली त्यानंतर प्रांजलीने तिच्याकडे काय अशा अविर्भावात पाहिले. त्यानंतर सई म्हणाली ,"अग उघडून तर बघ तुला आवडेल तुझी ही वाढदिवसाची भेटवस्तू माझ्याकडून" हे ऐकल्यानंतर प्रांजलीने ती भेटवस्तू खोलून पाहिली तर त्यात एक सुंदर गोष्टींची पुस्तक होतं. ते बघून प्रांजलीला आनंद झाला दोघींनी एकमेकींना मिठा मारल्या आणि दोघी जेवायला निघून गेल्या. त्यानंतर प्रांजली घरी निघून आली आणि तिने आईला घट्ट अशी मिठी मारली आणि आईला म्हणाली." हे बघ मला सईने काय दिलं परींच्या गोष्टीचे पुस्तक". त्यावर आई म्हणाली, "अरे वा छानच की"त्यावर प्रांजली म्हणाली, "अगं या तर झाल्या गोष्टीतल्या परी पण माझ्यासाठी माझ्या खऱ्या आयुष्यातील परी तर तू आहेस ना माझी आई नावाची परी...."



# लोणार सरोवर : निसर्गाचा अद्वितीय चमत्कार आणि वैज्ञानिक आश्चर्य

(पान २१ वरून)

लोणार सरोवर मध्ये सासु सुन ची विहीर पाहायला मिळते.सासु-सूनेच्या या विहिरीतील देवीच्या मंदिराकडील पाणी हे गोड आहे, म्हणजेच ते सुनेचे पाणी होय. तर विरुद्ध बाजूचे पाणी हे खारे म्हणजेच ते सासूचे पाणी होय. त्यामुळे तिला सासु-सूनेच्या विहिर असे संबोधले जाते.

### लोणार धार

लोणार धार ही लोणार सरोवराच्या जवळच आहे व धार वरुन लोणार सरोवर संपूर्ण दिसते. लोणार धार येथे अनेक मंदिर आहे व येथे एक धार नेहमी चालू असते ती कुठून येते ते कोणालाच माहिती नाही,पण ती धार नेहमी चालू असते कधीच बंद होत नाही यामुळे येथे अनेक पर्यटन नागरिक धार बघायला येतात येथे स्नान करतात.

### सिंदखेडराजा

सिंदखेड राजा हे लोणार सरोवर येथून फक्त 50 कि.मी वर आहे. सिंदखेड राजा हे महाराष्ट्राच्या बुलडाणा जिल्ह्यातील एक ऐतिहासिक शहर आहे. हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री राजमाता जिजाऊ यांचे जन्मस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे असलेले हे ठिकाण पर्यटक आणि इतिहासप्रेमींसाठी आकर्षणाचे केंद्र आहे.सिंदखेड राजा हे राजमाता जिजाऊंच्या वडिलांचे म्हणजेच माळोजीराजे भोसले यांचे जहागिरी ठिकाण होते सिंदखेडराजा येथे राजमाता जिजाऊ यांची मोठी मुर्ती आहे आणि अनेक ठिकाणी बघण्यासारखे आहे.

### श्री संत गजानन महाराज शेगाव

शेगाव हे लोणार पासून 100 किमी अंतरावर आहे व आपण शेगावला आल्यावर लोणार सरोवर ला भेट देऊ शकतो. शेगाव येथे श्री संत गजानन महाराज यांची समाधी आहे तिथे खूप मोठे मंदिर आहे व अनेक मंदिरे आहे तेथे फिरण्यासाठी आनंद सागर संत गजानन महाराज हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध संत आहे त्यांचा उगम अज्ञात आहे, परंतु ते प्रथम २३ फेब्रुवारी १८७८ रोजी शेगाव येथे प्रकट झाले गजानन महाराजांनी १९१० साली संजीवन समाधी घेतली. समाधीनंतरही त्यांची कृपा भक्तांवर असल्याचे मानले जातेशेगाव येथे गजानन महाराजांचे भव्य मंदिर असून, हे महाराष्ट्रातील सर्वाधिक श्रद्धास्थानांपैकी एक आहे. या ठिकाणी हजारो भक्त दररोज दर्शनाला येतात.

# कोपेश्वर खिद्रापूर मंदिर : नंदी नसलेले शिवमंदिर

(पान २० वरून)

येथे शिवलिंग दर्शनापूर्वी विष्णू दर्शन होते. प्रदक्षिणेच्या मार्गावर विविध भावनांचे प्रदर्शन करणाऱ्या मानवी आकृती कोरलेल्या दिसतात. 92 हत्तींवर आरुढ झालेल्या वेगवेगळ्या देवतांच्या शिल्प कोरली आहे त्याला गजपट्ट म्हणतात. मंदिरात कोरलेल्या खांबांवर वेगवेगळ्या देवदेवता, त्यांचे पोशाख, दागिने अतिशय सूक्ष्म पणे कोरले आहे.

सातव्या शतकात चालुक्य सम्राट द्वितीय यांनी हे मंदिर उभारले आणि बाराव्या शतकात यादव सम्राट सिंगन देव यांनी उर्वरित काम पूर्ण केले. मंदिर उभारणी ते जिर्णोद्धार, सहाशे वर्षांच्या अंतर होते. दुर्दैवाने काही विकृत मानवी कृत्याने या मंदिराचा काही भाग फोडलेला आहे. दीड हजार वर्षापूर्वीच्या या मंदिराचे काळाच्या ओघात खूप नुकसान झालेले आहे, पर्यटनाच्या दृष्टीने दुर्लक्षित हे मंदिर एक स्थापत्य कलेचा अविष्कार आहे, जो लोकांसमोर, कलाप्रेमींसमोर आणि भावी पिढीसमोर हा अनमोल ठेवा यायला हवा.







# कचरा व्यवस्थापन आणि त्याचा भविष्यातील विकास



**वाढत्या लोकसंख्येमुळे आणि शहरीकरणामुळे कचऱ्याचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. मात्र, हा केवळ आजचा प्रश्न नाही, तर भविष्यातील एक मोठे आव्हान आणि संधी दोन्ही आहे. स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शहरे स्वच्छ आणि पर्यावरणपूरक करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दुसरीकडे, ग्रामीण भागात अजूनही कचरा व्यवस्थापनाच्या सुविधांचा अभाव आहे.**

**श्रुती सोमलिंग पुजारी**

भारत सरकारने स्मार्ट सिटी प्रकल्प हाती घेतला आहे, ज्यामध्ये शहरे अधिक सुसज्ज आणि तंत्रज्ञानाधारित करण्याचा प्रयत्न केला जात आहे. स्मार्ट सिटी संकल्पनेत कचरा व्यवस्थापन हा एक महत्त्वाचा भाग आहे. स्मार्ट डस्टबिन्स, कचरा वर्गीकरण करणारी स्वयंचलित प्रणाली, आणि कचऱ्याचा पुनर्वापर करणाऱ्या सुविधा या माध्यमातून शहरी भागांतील कचऱ्याचे व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे करता येईल.

काही शहरांमध्ये आधीच RFID-आधारित कचरा व्यवस्थापन प्रणाली लागू करण्यात आली आहे. यामध्ये कचरा संकलन करणाऱ्या ट्रकला ट्रॅक करण्यासाठी GPS प्रणालीचा वापर केला जातो, तसेच नागरिकांना त्यांच्या परिसरातील कचरा व्यवस्थापनाबद्दल थेट माहिती मिळते. जर ही प्रणाली संपूर्ण भारतात लागू केली गेली, तर कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी होऊ शकते.

## ग्रामीण भागातील कचरा व्यवस्थापन आणि आव्हाने

शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागांमध्ये कचरा व्यवस्थापनाची परिस्थिती वेगळी आहे. ग्रामीण भागात कचऱ्याचे प्रमाण तुलनेने कमी असले, तरी व्यवस्थापनाच्या सोयी-सुविधांची कमतरता आहे. अनेक गावांमध्ये अजूनही कचरा उघड्यावर टाकण्याची पद्धत प्रचलित आहे, ज्यामुळे माती आणि पाणी प्रदूषण होते.

**ग्रामीण भागातील कचरा व्यवस्थापन सुधारण्यासाठी काही उपाय अमलात आणता येऊ शकतात:**

1. घरोघरी कचरा संकलन सेवा सुरू करणे: अनेक गावांमध्ये अजूनही अशी कोणतीही सेवा उपलब्ध नाही.
2. कंपोस्टिंग प्रकल्प उभारणे: जैविक कचऱ्याचा पुनर्वापर करून त्यापासून सेंद्रिय खत तयार करता येईल.
3. ग्रामपंचायतींना आर्थिक मदत देणे: स्थानिक प्रशासनाला कचरा व्यवस्थापन यंत्रणा उभारण्यासाठी अनुदान द्यावे.
4. शिक्षण आणि जागरूकता: नागरिकांना कचरा वर्गीकरण आणि पुनर्वापराच्या महत्त्वाबद्दल माहिती देणे आवश्यक आहे.


## प्लास्टिक प्रदूषण आणि त्यावरील उपाय

प्लास्टिक प्रदूषण ही एक मोठी समस्या आहे, विशेषतः भारतासारख्या देशात जिथे दररोज १ लाख टनांहून अधिक प्लास्टिक कचरा निर्माण होतो. यातील फक्त ६०% प्लास्टिकचा पुनर्वापर केला जातो, तर उर्वरित प्लास्टिक नद्या, समुद्र आणि जमिनीत साचून पर्यावरणाला हानी पोहोचवते.




**प्लास्टिक कचऱ्याचा पुनर्वापर करण्यासाठी काही उपाय:**

1. प्लास्टिक बंदी: अनेक राज्यांमध्ये सिंगल-यूज प्लास्टिकवर बंदी घालण्यात आली आहे, पण त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे केली जाणे गरजेचे आहे.
2. बायोडिग्रेडेबल प्लास्टिकचा वापर: पर्यावरणपूरक प्लास्टिक विकसित करण्यावर संशोधन सुरू आहे. भविष्यात बायोडिग्रेडेबल प्लास्टिक सामान्य प्लास्टिकला पर्याय म्हणून




**कचरा व्यवस्थापनाच्या पद्धती**

वापरले जाऊ शकते.

3. प्लास्टिक कचऱ्याचा पुनर्वापर करून रस्ते बांधणी: काही राज्यांमध्ये प्लास्टिकचा पुनर्वापर करून रस्ते तयार केले जात आहेत, हे एक उत्तम उदाहरण ठरू शकते.

## कचरा व्यवस्थापनातील नवीन संशोधन आणि नवकल्पना

जसे-जसे विज्ञान आणि तंत्रज्ञान पुढे जात आहे, तसे नवीन संशोधन आणि नवकल्पना कचरा व्यवस्थापनाच्या प्रक्रियेत क्रांती घडवत आहेत. उदाहरणार्थ:

1. बायोमायनिंग तंत्रज्ञान: या तंत्रज्ञानाच्या मदतीने जुने कचरा ढिगारे कमी करून त्यामधून उपयुक्त पदार्थ वेगळे काढले जातात. काही भारतीय शहरांमध्ये याचा यशस्वी प्रयोग सुरू आहे.

2. Waste-to-Energy प्रकल्प: सांडपाण्याचा आणि घनकचऱ्याचा वापर करून बायोगॅस किंवा वीज निर्मिती केली जात आहे.

3. नॅनो तंत्रज्ञान: काही प्रयोगशाळांमध्ये नॅनो तंत्रज्ञानाचा वापर करून कचऱ्याचे वेगाने विघटन करण्यावर संशोधन सुरू आहे.

4. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI): स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत AI-आधारित कचरा वर्गीकरण प्रणाली विकसित केली जात आहे.

## कचरा व्यवस्थापन आणि सरकारी धोरणे

केंद्र आणि राज्य सरकारांनी कचरा व्यवस्थापन सुधारण्यासाठी अनेक योजनांची घोषणा केली आहे, पण त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

## भारत सरकारच्या महत्त्वाच्या योजना:

स्वच्छ भारत अभियान: या योजनेंतर्गत कचरा व्यवस्थापनाच्या संकल्पनांना चालना देण्यात आली आहे.

राष्ट्रीय प्लास्टिक धोरण: २०२२ पासून सिंगल-यूज प्लास्टिकवर बंदी घालण्यात आली आहे.

शहरी घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६: या अंतर्गत शहरे आणि महानगरांना कचरा व्यवस्थापनासाठी काही अनिवार्य नियम लागू करण्यात आले आहेत.

E-Waste Management Rules: ई-कचऱ्याच्या पुनर्वापरासाठी नवीन धोरणे लागू करण्यात आली आहेत.

## नागरिकांची भूमिका आणि जबाबदारी

कचरा व्यवस्थापन यशस्वी करण्यासाठी केवळ सरकारी धोरणे पुरेशी नाहीत. नागरिकांनीही त्यात सक्रिय सहभाग घ्यावा लागेल. प्रत्येक व्यक्तीने खालील बाबींचे पालन केल्यास कचऱ्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते:

1. ओला आणि सुका कचरा वेगळा करणे: घरोघरी कचऱ्याचे वर्गीकरण करणे आवश्यक आहे.

2. प्लास्टिकचा कमीत कमी वापर करणे: शक्यतो पर्यावरणपूरक पर्याय निवडावेत.

3. कंपोस्टिंग करण्याची सवय लावणे: घरच्या घरी जैविक कचऱ्यापासून खत तयार करणे फायदेशीर ठरू शकते.

4. स्थानीय प्रशासनाला सहकार्य करणे: आपल्या भागातील सफाई मोहिमांमध्ये सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे.

5. इतरांना जागरूक करणे: शाळा, कॉलेज आणि गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये कचरा व्यवस्थापनावर कार्यशाळा आयोजित कराव्यात.

कचरा व्यवस्थापन हे केवळ सरकार किंवा स्थानिक प्रशासनाचे काम नाही, तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. तंत्रज्ञानाच्या मदतीने आणि जबाबदार नागरिकांच्या सहकार्याने आपण एक शाश्वत आणि स्वच्छ भविष्य घडवू शकतो. भारताने या क्षेत्रात अधिक संशोधन आणि गुंतवणूक केल्यास जागतिक स्तरावर आपली ओळख निर्माण होऊ शकते. स्वच्छ भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपली भूमिका पार पाडली पाहिजे.

# आचार्य पंडित मुकुल शिवपुत्र : स्वरतपस्वी गंधर्व



**आचार्य पंडित.मुकुल शिवपुत्र हे हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या अद्वितीय गायकांपैकी एक आहेत. पंडित कुमार गंधर्व यांचे सुपुत्र अशी ही ओळख असली तरी त्यांच्या गायकीचा प्रवास स्वतंत्र आणि विलक्षण आहे. त्यांच्या आवाजातील गूढता, विरक्ती आणि अध्यात्मिक शक्ती जाणवते. शब्दांवरील अलौकिक पकड, रागांची सखोल जाण यामुळे त्यांची गायकी आणि ओळख ही त्यांची आहे.**


**गीत इनामदार**

आचार्य पंडित.मुकुल शिवपुत्र हे हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या अद्वितीय गायकांपैकी एक आहेत. पंडित कुमार गंधर्व यांचे सुपुत्र अशी ही ओळख असली तरी त्यांच्या गायकीचा प्रवास स्वतंत्र आणि विलक्षण आहे. त्यांच्या आवाजातील गूढता, विरक्ती आणि अध्यात्मिक शक्ती जाणवते. शब्दांवरील अलौकिक पकड, सूर/रागांची सखोल जाण आणि ठहरावयुक्त सादरीकरण यामुळे त्यांची गायकी आणि ओळख ही त्यांची आहे.

फेम/प्रसिद्धी पासून दूर राहिल्येल्या या स्वरतपस्वी ने संगीताला केवळ कला म्हणून नव्हे, तर एका साधनेप्रमाणे जगले.त्यांच्या गाण्यात केवळ राग नव्हे तर त्या मागील भाव, तत्वज्ञान आणि गूढता स्पष्टच दिसते.

## दोन वर्षांच्या विश्रांतीनंतर मुकुलजी परतले!

दोन वर्षांच्या विश्रांतीनंतर २७ फेब्रुवारी ला रात्री ८:३० वाजता, महाराष्ट्र कल्चरल सेंटरच्या श्रीराम लागू रंगावकाश येथे पुन्हा एकदा त्यांची मैफिल अनुभवता आली. मुकुलजी रंगमंचावर आले आणि तब्बल २० मिनिटे तानपुरा लावत शांत बसले! एक वेगळीच ऊर्जा आधीच वातवर्णात निर्माण झाली होती. त्यानंतर त्यांनी राग शुद्ध कल्याण आणि बहार कानडा गाऊन एक अद्भुत रूपच दाखवलं!



पहिल्या पर्वानंतर ४० मिनिटांच्या विश्रांतीनंतर ते परतले आणि गायनविषयी आपले विचार मांडु लागले. बोलता बोलता त्यांनी सहज राग बसंत सुरू केला, आणि श्रोते पुन्हा एकदा ह्या अश्या दैवी स्वरप्रवाहात वाहत गेले. शेवटी फक्त तानपुऱ्याच्या आणि पेटीच्या सुरांच्या आधारावर त्यांनी भैरवी गायली, पण ती भैरवी केवळ समाप्ती न्हावती पण एक अनहद नादाची अनुभूती होती. त्यांच्या स्वरांची ताकद आणि दैवी स्पर्श इतका विलक्षण होता की, एक एक सूर अंगावर शहारा आणत होता, कित्येक श्रोते भारावून गेले, डोळ्यात अश्रू दाटले.

ही केवळ एक मैफिल नव्हती - ही एक ऊर्जा होती, जी मुकुल जींच्या स्वरातून थेट आत्म्यात झिरपत होती. दोन वर्षांच्या शांततेनंतर पुन्हा रंगमंचावर परतलेले आचार्य पंडित. मुकुल शिवपुत्र आपल्या गायकीच्या अध्यात्मिक उंचीवर होते - 'स्वरतपस्वी गंधर्व' म्हणून.!

# पुण्यातील ऐतिहासिक 'मातीचा गणपती'



**मातीचा गणपती हे मंदिर सुमारे २०० ते २५० वर्षांपूर्वीचे आहे. त्याचे स्वरूप आता गाभारा, सभामंडप आणि त्यावर पक्के छत असे असले तरी पूर्वी हे कौलारू मंदिर होते. मंदिर खाजगी मालकीचे असून श्रोत्री घराण्याकडेच आहे. या गणपतीची सोंड डावीकडे असून, चतुर्भुज रूपातील ही मूर्ती भक्तांसाठी श्रद्धेचे केंद्र आहे. या बाप्पाची सोंड डावीकडे वळलेली आहे म्हणजे ही मूर्ती डाव्या सोंडेची आहे.**

**काजल राजू पवार**

नारायण पेठेत माती गणपती हे मंदिर आहे. शिवरामपंत श्रोत्री यांना मुठा नदीच्या मातीमध्ये ही मूर्ती सापडली, म्हणून याला मातीचा गणपती हे नाव मिळाले. पेशवेकालीन या मंदिराने पानशेत पूरासारख्या आपत्तीही सहन केल्या, तरीही गणेशमूर्ती अबाधित राहिली. आजही श्रोत्री घराण्याच्या देखरेखीखाली येथे गणेश जयंती व इतर धार्मिक सोहळे पार पडतात.

गणपती उत्सव साजरा करण्यासाठी देशभरात इको-फ्रेंडली मूर्तींसाठी देशभर जोर लावला जात असताना, पुण्यातील एका मंदिरात १७व्या शतकात मातीची मूर्ती बनवण्यात आली आहे. आपण शहरातील कमी ज्ञात गणेश मंदिरे शोधत असताना आपल्याला शहरातील नारायण पेठ परिसरात असलेल्या 'मातीचा गणपती' (मातीचा गणपती) भेटतो. मुठा नदीतून वाहत आलेल्या मातीमध्ये शिवरामपंत श्रोत्री नावाच्या गृहस्थांना गणपती बाप्पाची एक सुंदर मूर्ती सापडली.1961 ला आलेल्या पानशेत पुराचा तडाका संपूर्ण पुण्याला बसला. यावेळी या मंदिराच्या वरून पाणी वाहत होते. मंदिरच संपूर्ण कळस पाण्याखाली गेला होता मात्र यात विशेष बाब म्हणजे माती गणपतीची मूर्ती ही मातीची असून सुद्धा ती जशीच्या तशी होती. मंदिर पेशवेकालीन असून हे मंदिर नदीच्या अगदी जवळ आहे. मुठा नदीतून वाहत आलेल्या मातीमध्ये शिवरामपंत श्रोत्री नावाच्या गृहस्थांना गणपती बाप्पाची एक सुंदर मूर्ती सापडली.



त्यांनी या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना केली आणि मातीत सापडलेली मूर्ती म्हणून या गणपतीला मातीचा गणपती हे नाव पडले. शेंदुर्लीप्त असलेली बाप्पाची ही मूर्ती सुमारे साडेचार फूट उंच असून 4 हात असलेली चतुर्भुज अशी ही मूर्ती आहे. या बाप्पाची सोंड डावीकडे वळलेली आहे म्हणजे ही मूर्ती डाव्या सोंडेची आहे. बाप्पाच्या वरच्या डाव्या हातात फुल असून उजवा हात अभयमस्त आहे. तर खालचा डावा हात हा खालच्या गुडघ्यावर असून दुसऱ्या हातात परशु आहे. हे मंदिर खाजगी मालकीचा असून हे अजूनही श्रोत्री घराण्याकडेच आहे. या मंदिरात माघातल्या गणेश जयंती उत्सवासहित इतर सर्व धार्मिक सोहळे विधिवत पार पडतात. शिवराम पंथ श्रोत्री यांना ही मातीची मूर्ती सापडण्याच्या आधी देखील या मूर्तीचा एक वेगळा इतिहास आहे तो आज आपण जाणून घेऊया.असे मानले जाते की ज्या ठिकाणी मंदिर आहे ते जंगल होते आणि या ठिकाणी थांबणारे लहान मुले मातीच्या गणेशमूर्ती बनवायचे आणि नंतर घरी जाताना त्या मूर्ती तोडायचे. मोरया गोसावी, जे गणेश मंदिरांच्या शोधात फेरफटका मारत होते, त्यांनी लहान मुलांना मूर्ती बनवायला मदत केली आणि मूर्ती फोडू नका आणि त्याऐवजी प्रार्थना करण्याचा सल्ला दिला – म्हणून त्याला मातीचा गणपती हे नाव पडले आणि त्यानंतर हा मातीचा गणपती शिवराम पंतश्रोत्री यांना सापडला आणि तेव्हापासून ही मूर्ती नारायण पेठेत स्थापित झाली.

# ‘आदिम’ संवाद-
# भूतकाळातील कोड



**आज आपल्या हातात सोशल मीडिया आणि डिजिटल तंत्रज्ञान असले तरी, संवादाचा प्रारंभ चित्रांमधून झाला होता. अश्मयुगीन मानवाने दगडी भिंतींवर आणि जमिनीवर कोरलेली कातळ शिल्पे म्हणजेच त्याकाळचा संवादाचा अनोखा प्रयत्न होता. महाराष्ट्राच्या कोकण भागातील अशा हजारो कातळ शिल्पांचा शोध लागला असून, ती मानवाच्या आदिम संवादाची साक्ष देतात.**

**आशिष निर्मला गिरीष सावळे**

मानवाच्या संवादाच्या प्रवासाला हजारो वर्षांचा इतिहास आहे. आज आपल्या हातात सोशल मीडिया आणि डिजिटल तंत्रज्ञान असले तरी, संवादाचा प्रारंभ चित्रांमधून झाला होता. अश्मयुगीन मानवाने दगडी भिंतींवर आणि जमिनीवर कोरलेली कातळ शिल्पे म्हणजेच त्याकाळचा संवादाचा अनोखा प्रयत्न होता. महाराष्ट्राच्या कोकण भागातील अशा हजारो कातळ शिल्पांचा शोध लागला असून, ती मानवाच्या आदिम संवादाची साक्ष देतात. पण ही चित्रे का काढली गेली? त्यांचा अर्थ काय असू शकतो? अशा अनेक प्रश्नांचा शोध घेत निसर्गयात्री आणि पुरातत्त्व विभाग यांनी या शिल्पांना जागतिक व्यासपीठावर आणले आहे. आजही या कलेतील रहस्यं, त्यातील संदेश आणि त्यांचा ऐतिहासिक महत्त्वाचा शोध सुरूच आहे.

हजारो वर्षांच्या उत्क्रांतीनंतर आज माणसांकडे संवादासाठी अनेक माध्यम उपलब्ध झाली आहेत. भौगोलिक प्रदेशानुसार वेगवेगळी भाषा निर्माण झाली. त्याद्वारे माणसं एकमेकांशी संवाद साधू लागले. गुहांमध्ये भित्तीचीत्र काढू लागला. काही काळानंतर भाषेला लिखित स्वरूप मिळाले. माणूस लिहू लागला. आपले विचार, निरीक्षण अशा अनेक गोष्टी चित्र स्वरूपात, लिखित स्वरूपात नोंदवू लागला. त्या नोंदींचा उपयोग पुढच्या पिढीला उपयुक्त ठरत राहिला. याच नोंदी समजून घेण्याच्या प्रक्रियेला ढोबळ मानाने इतिहासाचा अभ्यास करणे म्हणता येईल.



**महाराष्ट्राच्या कोकण भागात अशा कातळ शिल्पांचा शोध लागला असून, ती मानवाच्या आदिम संवादाची साक्ष देतात.**

हजारो वर्षांपूर्वी मानवाने काही निरीक्षणं चित्र स्वरूपात नोंदवली होती. आणि ती निरीक्षणं, ती चित्रं निसर्गयात्री या संस्थेने आणि पुरातत्व विभागाने जगासमोर आणली आहेत. महाराष्ट्रातील कोकण भागात (मुख्यतः रत्नागिरी जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये) अश्मयुगीन काळातली ‘कातळ शिल्प’ (geoglyphs) आढळून आली आहेत. २०१२ सालापासून या कातळ शिल्पांचा शोध सुरू आहे. या दरम्यान १७०० हून अधिक कातळ शिल्पांचा शोध घेतला आहे. ही कातळ शिल्पे पाहून देश विदेशातील अभ्यासक आपापल्या परीने



**अनेक पर्यटक व अभ्यासक या कातळ शिल्पांकडे आकर्षित झालेले आहेत.**

त्याचे अर्थ लावण्याचा प्रयत्न करत आहेत. ही कातळ शिल्पे भूपृष्ठ भागावर दगडी हत्यारांच्या मदतीने काढली आहेत. नदी पात्रातून व इतर भागातून दगड गोळा करून गुहेत तो हत्यारे बनवत व त्याचा उपयोग कातळ शिल्पे तयार करण्यासाठी देखील करत. अनेक कातळ शिल्पांजवळ त्या काळातील हत्यारांच्या अवशेष आढळले आहेत.

कोकणातल्या जांभा दगडावर कोरलेल्या या कातळ शिल्पांमध्ये हत्ती, घोडे, मासे, मगर, गेंडे, हरीण, वाघ अशा अनेक प्राण्यांची चित्रं जमिनीवर कोरलेली आहेत. त्याच बरोबर मनावाकृती देखील कोरलेली पाहायला मिळते. या कातळ शिल्पांचा आकार २-३ फुटांपासून ते अगदी ५० फूट पेक्षा अधिक मोठ्या आकाराची कातळ शिल्प आहेत. या शिल्पांजवळ आणखी एक विलक्षण गोष्ट पाहायला मिळते ती म्हणजे काही शिल्पे अर्धवट स्वरूपाची देखील पाहायला मिळतात. जसजशी ही शिल्पे सापडत आहेत तसे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. मानवाला ही चित्रं का कोरावी वाटली असतील? कोणत्या काळात ही चित्रं काढली असावीत? ज्या भौमितिक आकृत्या काढल्या आहेत त्या अकृत्यांचे त्याच्या दृष्टिकोनातून काय अर्थ असतील? असे अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न निसर्गयात्री करत आहेत.

या शोधतील अनेक कातळ शिल्पांचा जागतिक वारसा स्थळांमध्ये समावेश करण्यात आला आहे. अनेक पर्यटक व अभ्यासक या कातळ शिल्पांकडे आकर्षित झालेले पाहायला मिळतात. यामुळे स्थानिकांना उत्पन्नाचे साधन निर्माण झाले आहेत. इन्स्टा, ट्विटर आणि व्हॉट्सअँप च्या जगात आदिम संवाद अजूनही एक कोडं बनून त्यांच्या अस्तित्वाच्या खुणा दाखवतात ही भुवया उंचावणारीच गोष्ट म्हणावी लागेल.

# हायपर सेंसिटिव्हिटी न्यूमोनिया:

## कबुतरांपासून होणारा गंभीर श्वसन विकार आणि प्रतिबंधात्मक उपाय



**शहरीकरणाच्या वाढत्या प्रभावामुळे आणि कबुतरांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे हायपर सेंसिटिव्हिटी न्यूमोनिया (HP) हा श्वसनसंस्थेशी संबंधित गंभीर आजार होण्याचे प्रमाणही वाढले आहे. हा आजार प्रामुख्याने कबुतरांच्या विष्ठा, पिसे, धूळ, बुरशी, सेंद्रिय पदार्थ, तसेच इतर जैविक घटकांच्या संपर्कामुळे होतो.**

**इनुराद राजेश विश्वकर्मा**

कबुतरांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे हायपर सेंसिटिव्हिटी न्यूमोनिया (HP) हा श्वसनसंस्थेशी संबंधित गंभीर आजार होण्याचे प्रमाणही वाढले आहे. पुणे महानगरपालिका (PMC) या समस्येवर लक्ष केंद्रित करून शहरात काही महत्त्वपूर्ण प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवत आहे.

डॉ. अमित देशमुख (फुफ्फुसरोग तज्ज्ञ) यांच्या मते, हायपर सेंसिटिव्हिटी न्यूमोनिया हा एक दिर्घकालीन श्वसन विकार आहे, जो सतत धुळीच्या संपर्कात राहिल्याने किंवा प्रथिनयुक्त जैविक घटकांचा दीर्घकालीन प्रभाव पडल्याने उद्भवतो. हा आजार होण्याची प्राथमिक कारणे म्हणजे कबुतरांच्या विष्ठेमध्ये असलेली विशिष्ट प्रकारची प्रथिने, शेतीतील धूळ, सेंद्रिय पदार्थ, तसेच इतर प्रकारचे बुरशीजन्य घटक. कबुतरांची विष्ठा कोरडी झाल्यानंतर ती हवेत मिसळते आणि अत्यंत बारीक कण स्वरूपात श्वासावाटे शरीरात प्रवेश करते. ही कण फुफ्फुसांमध्ये जमा होऊन दाह (इंफ्लेमेशन) निर्माण करतात आणि त्याचा दीर्घकालीन परिणाम म्हणून फुफ्फुसांची कार्यक्षमता कमी होते.या आजाराची लक्षणे सुरुवातीला सौम्य स्वरूपाची असतात, जसे की खोकला, दम लागणे, छातीत जडपणा वाटणे, श्वास घेण्यास त्रास होणे, ताप येणे आणि थकवा जाणवणे. काही प्रकरणांमध्ये, हा आजार गंभीर अवस्थेत गेल्यास फुफ्फुसांची फायब्रॉसिस (स्निग्ध ऊतकांची वाढ) होऊ शकते, ज्यामुळे ऑक्सिजन शरीरात योग्य प्रमाणात पोहोचत नाही आणि व्यक्तीला दीर्घकालीन श्वसनाचे विकार जडू शकतात. त्यामुळे वेळीच निदान आणि उपचार करणे अत्यं8त गरजेचे आहे.



पुणे महानगरपालिकेने कबुतरांमुळे होणाऱ्या आजारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी विविध उपाययोजना केल्या आहेत. शहरातील प्रमुख चौक, उद्याने आणि रहिवासी भागांमध्ये कबुतरांना खाऊ घालण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. PMC ने 'कबुतरांना सार्वजनिक ठिकाणी खाऊ घालू नका' असे फलक विविध भागांत लावले आहेत, विशेषतः बिबवेवाडीतील 'डॉल्फिन चौक' येथे मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली आहे. यासोबतच, उघड्यावर कबुतरांना दाणे टाकणाऱ्या नागरिकांवर PMC कडून कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

HP टाळण्यासाठी काही प्रतिबंधात्मक उपाय योजणे आवश्यक आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे पर्यावरण आणि आरोग्याची स्वच्छता राखणे. घर आणि परिसर स्वच्छ ठेवावा आणि धूळ, बुरशी व इतर हानिकारक घटकांचा संपर्क टाळावा. मास्क आणि ग्लोव्हजचा वापर करून स्वतःला धुळीपासून वाचवणे महत्त्वाचे आहे. जर एखाद्या व्यक्तीला श्वसनासंबंधी लक्षणे जाणवत असतील, तर त्याने त्वरित फुफ्फुसरोग तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

डॉ. अमित देशमुख सांगतात की, या आजाराचे निदान लवकर झाल्यास तो पूर्णतः बरा करता येतो. मात्र, HP चे निदान उशिरा झाले किंवा योग्य उपचार घेतले नाहीत, तर फुफ्फुसांच्या कायमस्वरूपी नुकसानाचा धोका वाढतो. यासाठी उपचारांमध्ये प्रामुख्याने स्टेरॉईड्स, श्वसन क्षमता वाढवण्यासाठी औषधे आणि प्राणवायू थेरपीचा (Oxygen Therapy) समावेश असतो. काही प्रकरणांमध्ये, अत्यंत गंभीर अवस्थेत फुफ्फुस प्रत्यारोपण हाच एकमेव पर्याय राहतो.






आपल्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणावर कबुतरे दिसतात. बऱ्याच लोकांना त्यांना दाणे टाकण्याची सवय असते, तर काहीजण कबुतरं पाळतात. मात्र, ही सवय आपल्या आरोग्यासाठी हानिकारक ठरत आहे. कबुतरांच्या विष्ठेतून अनेक बुरशीजन्य आणि जंतुसंसर्गजन्य आजार होत आहेत .हिस्टोप्लास्मोसिस (HP) हा त्यापैकी एक गंभीर आजार आहे, जो फुफ्फुसांवर परिणाम करतो. या विष्ठेत असलेली बुरशी हवेत मिसळते आणि श्वासावाटे शरीरात गेल्यास श्वसनाचे विकार, दम्याचा त्रास, ॲलर्जी किंवा फुफ्फुसांचे मोठे आजार होत आहेत.

कबुतरांना घरात स्थान देण्याऐवजी त्यांना मोकळ्या जागेत ठेवावे. त्यांच्या विष्ठेची स्वच्छता करताना मास्क आणि हातमोजे वापरणे आवश्यक आहे. तसेच, घराच्या गॅलरीत किंवा खिडक्यांवर कबुतरं घर करू नयेत, यासाठी जाळ्या बसवाव्यात. सार्वजनिक ठिकाणी त्यांना खायला टाकण्यामुळे त्यांची संख्या अनावश्यकरीत्या वाढते आणि आजार पसरण्याचा धोका वाढतो. त्यामुळे कबुतरांपासून पूर्णपणे दूर राहणे किंवा त्यांची संख्या नियंत्रित ठेवणे गरजेचे आहे. थोडीशी काळजी घेतली, तर आपल्या आरोग्याचे आणि सभोवतालच्या स्वच्छतेचे रक्षण करता येईल.सार्वजनिक ठिकाणी कबुतरांना दाणे किंवा अन्न टाकल्याने त्यांची संख्या वाढते आणि विष्ठेमुळे आजार पसरण्याचा धोका वाढतो.कबुतरांची मोठ्या प्रमाणात वस्ती असलेल्या ठिकाणी (जसे की चौक, मंदिरे, जुनी इमारती) नियमित स्वच्छता केली पाहिजे . कबुतरांना बसण्यास प्रतिबंध करण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी जाळ्या किंवा स्पाईक्स लावाव्यात.

हायपर सेंसिटिव्हिटी न्यूमोनिया हा एक गंभीर आणि टाळता येण्यासारखा श्वसन विकार आहे. स्वच्छता, जनजागृती आणि वैद्यकीय सल्ला घेणे हेच यावर सर्वोत्तम उपाय आहेत. पुणे महानगरपालिकेच्या उपाययोजनांमुळे नागरिकांमध्ये जागरूकता वाढत आहे आणि हा विकार टाळण्यासाठी आवश्यक पावले उचलली जात आहेत. कबुतरांना उघड्यावर खाऊ न घालणे आणि परिसर स्वच्छ ठेवणे हे आपल्या आरोग्यासाठी आणि पर्यावरणासाठीही फायदेशीर ठरेल. आज घेतलेली काळजी आपल्या व आपल्या परिवारास त्याच बरोबरच आपल्या परिसरास अत्यंत लाभदायक ठरेल.

---

# तळेगावचे पाच पांडव मंदिर: एक पौराणिक ठेवा

**(पान २४ वरून)**

आतल्या खोलीत डोकावून पाहिल्यास द्रौपदी शयन करत असलेली मूर्ती दिसते. धर्मराज आणि भीम यांच्या मूर्तींच्या मध्यवर्ती भागातून द्रौपदीचे चेहरा स्पष्टपणे दिसते. पांडव आणि द्रौपदीचे एकत्र असलेले असे मंदिर बहुधा एकमेव आहे.

अर्जुनाच्या पुढ्यात रथाची एक छोटी प्रतिकृती ठेवलेली आहे, जी त्याच्या वीरतेचे प्रतीक मानली जाते. श्रीमंत सर सेनापती उमाबाई दाभाडे यांच्या काळातील हे मंदिर आहे, असं भिंतीवर उल्लेख केले गेले आहे. त्यानुसार, मंदिराचे वय किमान 250 वर्षे असावे. महाभारताची एक वेगळीच अनुभूती या ठिकाणी मिळते. दरवर्षी पांडव पंचमीला, पांडवांची पूजा दिवे लावून केली जाते. तळेगावातील लोक तिथे पांडव पंचमी साजरी करण्यासाठी एकत्र येतात आणि मंदिर परिसरात दर्शन घेतात. आजही हे मंदिर स्थानिकांसाठी श्रद्धेचे आणि इतिहासाचे एक महत्त्वाचे केंद्र आहे. जर तुम्ही तळेगावला आलात, तर नक्कीच या मंदिराला भेट द्या आणि त्याचे ऐतिहासिक व आध्यात्मिक महत्त्व अनुभवा.



**द्रौपदी शयन करत असलेली मूर्ती**

# कविता

राधाई मोहनराव सोनोने



## बापमाणूस

*जीवनाच्या प्रत्येक वळणावर*
*जो खंबीरपणे आपल्या पाठीशी उभा असतो,*
*आपण त्याचा 'सिंबा'*
*तर तो आपला 'लायन किंग' असतो,*
*न दाखवता देखील जो आपल्यावर*
*सगळ्यात जास्त प्रेम करतो*
*तोच आपला बाप असतो...*

*कधी खूप ओरडतो,*
*तर कधी मायेने जवळ घेतो,*
*रात्रंदिवस एक करून*
*आपल्या पाल्यांसाठी कष्ट करतो,*
*तोच तर आपला बाप असतो...*

*स्वतः तुटकी चप्पल वापरतो,*
*कधी कपडेही नवीन घेत नाही,*
*फक्त आपल्या लेकराचं*
*हसू बघून सुखी होतो,*
*तोच तर आपला बाप असतो*

***तोच तर आपला बाप असतो... -***



# कविता


आशिष निर्मला गिरीष सावळे



## कागदाचं विमान कर

*माझं एक मन होत कागदाच्या विमानासारख*
*बघ तुझ्या गच्चीवर आलंय का..?*

*आलं असेल तर त्याला थोडं जवळ घे*
*चार दोन गोष्टी शिकव आपलेपणाच्या..*
*थोडं मिश्किल आहे थोडं चंचल आहे*
*हाती लवकर येणार नाही तरसू नकोस..*
*थोडी मस्ती करेन जरा तुला न्यहाळेल*
*चार दोन प्रश्नही करेल कातरू नकोस..*



*थोडं भटकेल, रमेलही तुझ्यासोबत*
*जवळ केलस तर येऊन पडेलही तुझ्या मांडीवर..*
*तेव्हा त्या शांत मनाला सायंकाळी*
*भगवंत ग्राऊंडवर घेऊन येशील?*
*परत द्यायला..!*
*तिथं लोकांच्या गर्दीत मला तू दिसलीस*
*तर हळूच घेऊन जाईल त्याला तुझ्याही नकळत..*

*घरी परतशील तेव्हा तुला thank you*
*लिहून विमान बनवून फेकेन पुन्हा गच्चीवर..*
*आणि तुझी इच्छा असेल तर बनव*
*तू ही एक कागदच विमान*
*माझ्या वेलकम च..!*

# पुस्तक परिचय

पार्थ कहाकरकर



# श्रीराम कथामृत

*"रामो विग्रहवान् धर्मः साधुः सत्यपराक्रमः।*
*राजा सर्वस्य लोकस्य देवानां मधवानिव।।"*

असे श्लोक ज्यांच्यासाठी वापरले जातात अशा प्रभू श्रीरामचंद्रांचे आदर्श जीवन लोकांना समजण्यासाठी व आपल्या दैनंदिन जीवनात ते कसे उपयोगी आणता येईल यासाठी थोर प्रवचनकार व धर्माभ्यासक आचार्य गोविंद देव गिरी यांनी हा 'श्रीराम कथामृत' ग्रंथ लिहिलेला आहे.

या ग्रंथाचे महत्व म्हणजे श्रीराम कथेचा आधार घेऊन प्रभू श्रीराम हे लहानापासून ते मोठ्यापर्यंत त्यासोबतच समाजातील प्रत्येक घटकाला कसे आदर्श आहेत ह्याबद्दल सांगितले आहे. प्रभू श्रीराचंद्राच्या बाल्यकाळापासून त्यांचे आदर्श गुण या पुस्तकात मांडलेले आहे.




लेखक स्वामी गोविंद देव गिरी यांच्या लिखाणाचे कौतुक करावे तेवढे कमी आहे. मराठी भाषेच्या समृद्धतेचे एक प्रभावी उदाहरण म्हणजे हे पुस्तक आहे. या पुस्तकात प्रसंगानुरूप भाषा व शब्द वापरले आहेत. वाल्मिकी रामायणातले अवघड अवघड शब्दांचे स्वामी गोविंद देव गिरिजिनी सोप्या व सहज कळतील अशा शब्दांमध्ये रूपांतरण केले आहे. मनाचा ठाव सहजपणे घेतील व लहानापासून मोठ्यांपर्यंत अगदी सहजपणे आकलन होईल. प्रत्येक विषयाचे केलेले वर्णन हे सुटसुटीत व प्रभावी आहे. कुठल्याही प्रसंगाचे वर्णन करताना त्याला पाल्हाळपण अजिबात शिवलेले नाही.अनेक संस्कृत श्लोक व इतर भाषेतील रामायणातील प्रमाण यात आपल्याला पहायला मिळतात. प्रत्येक कथेचे शीर्षक कथा वाचण्याची उत्सुकता वाढवते.

पुस्तकाचे मुखपृष्ठावर प्रभू श्रीरामचंद्रांचे व मारुतीरायाचे चित्र आहे. जे दोघांचे रामायणातील महत्व दर्शवते. धनुष्य घेऊन उभे असे प्रभू रामाचे चित्र आहे तर त्यांचा पायाशी बसलेले मारुतीचे चित्र आहे.पुस्तकाच्या आतील पानात रामायणातील महत्वाच्या प्रसंगाचे चित्ररूप वर्णन केलेले आहे.

रामायणाबाबत असलेले अनेक गैरसमजाचे संदर्भासहित निराकरण केले आहे. भरत,शत्रुघ्न सारख्या प्रकाशझोतात नसलेल्या रामायणातील अनेक पात्राबद्दल विस्तृत माहिती दिलेली आहे. त्यांचे महत्व पटवून सांगितले आहे. रामायणातून आपण काय घेतले पाहिजे व कश्या पद्धतीने त्याचा अंगीकार आपण करू शकतो हे सांगितले आहे.

स्वामी गोविंद देव गिरी यांच्या धर्मश्री प्रकाशनाचे हे पुस्तक अगदी ३००रूच्या किमतीत आहे.साधारण ४५० पानांचे पुस्तक आहे. धर्मश्री प्रकाशनच्या कार्यालयात ते सहज मिळेल.

रामकथा अगदी जवळून आपल्याला या पुस्तकातून पाहायला मिळते. काही प्रसंग हृदयाला हात घालतात. रामायणकडे बघण्याचा एक नवा दृष्टिकोन या पुस्तकाद्वारे मिळतो.

**पुस्तकाचे नाव : श्री रामकथामृत**
**लेखक : श्री गोविंद देवजी गिरी**
**प्रकाशक : धर्मश्री, पाने : ३५०**